# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990



Bharat Chandak
SATYA ELECTRICALS
POLYCAB, Legrand, HAVELLS, Finolex, USHA, PHILIPS, SIEMENS
Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512
Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018
Email:satyaelectricals@rediffmail.com




लातूर वर्ष ३ रे अंक २१९ वा शुक्रवार दि.०२ फेब्रुवारी २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# मोदींसोबत नाही, त्याला जेलमध्ये टाकण्याचे धोरण

नवी दिल्ली : कथित जमीन घोटाळ्याप्रकरणी ईडीने हेमंत सोरेन यांच्यावर अखेर अटकेची कारवाई केली आहे. ईडीकडून अटकेच्या हालचाली सुरू झाल्यानंतर हेमंत सोरेन यांनी राज्यपालांकडे जात मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला. राजीनामा देऊन सोरेन हे घरी पोहोचताच ईडीने त्यांना अटक केली. यावरून काँग्रेसने केंद्र सरकारवर जोरदार टीका केली. जे लोक पंतप्रधान मोदी यांच्यासोबत नाहीत, त्यांना जेलमध्ये टाकण्याचे काम केले जात आहे, असे सांगत काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी केंद्रावर निशाणा साधला.मल्लिकार्जुन खरगे यांनी एक्सवर एक पोस्ट केली आहे. यामध्ये मोदींसोबत नाही, त्याला जेलमध्ये टाका हेच सुरू आहे. झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना राजीनामा द्यायला भाग पाडणे हे संघराज्य पद्धतीला धक्का लावण्यासारखे आहे. पीएमएलए कायद्याच्या तरतुदी चुकीच्या पद्धतीने कठोर करून विरोधी पक्षाच्या नेत्यांना भीती घालणे, धमकावणे हे सर्व भाजपाच्या टूलकिटचा भाग आहे. कट-कारस्थान करून विरोधी पक्षाच्या सरकारना कमकुवत करण्याचे काम भाजपा करत आहे. भाजपाच्या वॉशिंग मशीनमध्ये जो गेला, स्वच्छ चारित्र्याचा आणि भाजपासोबत न जाणा-यांवर विविध आरोप करून प्रतिमा डागाळण्याचे काम केले जात आहे. या हुकुमशाही प्रवृत्तीपासून लोकशाही वाचवायची असेल तर भाजपाला पराभूत करणे हाच पर्याय आहे. आम्ही घाबरत नाही. रस्त्यांपासून संसदेपर्यंत लढत राहू, या शब्दांत मल्लिकार्जुन खरगे यांनी हल्लाबोल केला.

लोकशाही संपविण्याचे अभियान : राहुल गांधी

काँग्रेस नेते आणि खासदार राहुल गांधी यांची भारत जोडो न्याय यात्रा सुरू आहे. राहुल गांधी यांनी एक्सवर पोस्ट करत भाजपावर टीका केली



आहे. ईडी, सीबीआय, आयटी या आता सरकारी संस्था राहिलेल्या नाहीत, आता त्या भाजपाच्या विरोधी पक्षांना संपविण्याच्या संस्था बनल्या आहेत. भ्रष्टाचारात बुडालेला भाजपाच सत्तेच्या नशेत लोकशाही नष्ट करण्याचे अभियान राबवत आहे, या शब्दांत राहुल गांधी यांनी टीकास्त्र सोडले.झारखंडमध्ये राजकीय संकट हेमंत सोरेन यांनी राजीनामा दिला असला आणि राज्यपालांनी तो मंजूर केला असला तरी सध्या झारखंडच्या काळजीवाहू मुख्यमंत्रिपदी तेच आहेत. घटनात्मकदृष्ट्या हे पद रिक्त राहणे योग्य नसल्याने जोपर्यंत नव्या मुख्यमंत्र्यांचा शपथविधी होत नाही, तोपर्यंत ते या पदावर राहतील. या सर्व घडामोडींमुळे झारखंडमध्ये राजकीय संकट उभे राहिले आहे. हेमंत सोरेन हे राजीनामा देणार असल्याचे निश्चित झाल्यानंतर सत्ताधारी पक्षाने नवे मुख्यमंत्री म्हणून चंपई सोरेन यांचे नाव निश्चित केले. तसेच राज्यपालांकडे सरकार बनवण्यासाठीचा दावाही सादर केला होता. मात्र राज्यपालांनी नव्या मुख्यमंत्र्यांच्या शपथविधीबाबत अद्याप निर्णय घेतलेला नाही.

## रोहित पवार यांच्यासाठी आज्ञी धावली!

मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या गटाचे आमदार रोहित पवार यांची आज पुन्हा एकदा ईडी चौकशी करण्यात येत आहे. रोहित पवार यांची याआधी देखील चौकशी करण्यात आली. त्यानंतर आज पुन्हा रोहित पवारांना चौकशीसाठी ईडी कार्यालयात हजर राहण्याचं समन्स बजावण्यात आलं होतं. त्यानुसार ते आज पुन्हा ईडी कार्यालयात दाखल झाले.रोहित पवार यांच्यावर ईडीकडून करण्यात येत असलेल्या कारवाईमुळे राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांमध्ये नाराजी आहे. अनेक कार्यकर्ते आक्रमक झाले. या कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादीच्या प्रदेश कार्यालयात गर्दी केली. या कार्यकर्त्यांनी ईडीच्या या कारवाईविरोधात प्रदेश कार्यालयाबाहेर आंदोलन सुरु केलं. यावेळी रोहित पवारांनी त्यांना आंदोलन न करण्याची विनंती केली.रोहित पवारांनी ईडी कार्यालयात जाण्यापूर्वी प्रसारमाध्यमांना प्रतिक्रिया देतांना सांगितले, मी व्यवसायात कुठेही चुकीची गोष्ट केलेली नाही. मी आधी व्यवसायात आलो नंतर राजकारणात आलो आहे. अशी अनेक लोक आहेत की जे पहिल्यांदा राजकारणात आले आहेत. नंतर व्यवसायात आले आहेत. पण त्यांना कोणतीही अडचण आलेली नाही. मी व्यवसाय करत असताना अनेक अडचणी आल्यात तेव्हा देखील मी संघर्ष केला आहे आणि आज राजकारणात आल्यानंतर संघर्ष करत आहे. येथून पुढेही मला संघर्ष करावा लागणार आहे.

## सर्वसामान्यांना न्याय देणारा, आत्मनिर्भर व बलशाली भारताचा पाया घालणारा अर्थसंकल्प - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

मुंबई, दि. १ : - आत्मनिर्भर व बलशाली भारताचा पाया घालणारा आणि विकसनशील भारत ते विकसित भारत अशी वाटचाल करणारा अर्थसंकल्प आहे, अशी प्रतिक्रीया मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज सादर करण्यात आलेल्या केंद्रीय अर्थसंकल्पाबाबत व्यक्त केली आहे. केले. हा केंद्रीय अर्थसंकल्प पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मागील १० वर्षांच्या प्रयत्नांचे फलित असून देशाला महासत्ता बनवण्याच्या आणि देशाला ५ ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनवण्याच्या त्यांच्या लक्ष्याकडे घेऊन जाणारा अर्थसंकल्प आहे, असेही मुख्यमंत्र्यानी म्हटले आहे. सर्वसमावेशक, सर्वसामान्यांना न्याय देणारा, महिला, तरुण, अबालवृद्ध, शेतकरी, कामगार या सर्वांचा विचार करून तयार करण्यात आलेला व त्यांना न्याय देणारा अर्थसंकल्प आहे. प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष कर रचनेत बदल न केल्याने सर्वसामान्य नागरिकांना दिलासा मिळाला आहे. शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी मागील दहा वर्षामध्ये आणलेल्या योजनांमध्ये सुधारणा करण्याचा निर्णय, गोदामांची अधिकाधिक व्यवस्था, आत्मनिर्भर तेलबिया अभियान, दुग्धोत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी सर्वंकष योजना यामुळे शेतकऱ्यांना निश्चितच स्वत:च्या पायावर उभे राहता येईल असेही मुख्यमंत्री म्हणतात.

मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे की, या अर्थसंकल्पामध्ये महिलांना विशेष प्राधान्य देण्यात आलेले आहे. १ कोटी महिलांना लखपती बनविण्याचा निर्णय जो घेण्यात आला होता, ते वाढवून ३ कोटी महिलांना लखपती बनवण्याचे लक्ष्य त्यांनी आजच्या अर्थसंकल्पात ठेवले आहे. अंगणवाडी सेविकांना (आशा सेविकांना) आयुष्यमान भारत चे कवच या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून देण्यात आले आहे. महिलांसाठी सर्वाकल कॅन्सरवर योजना आणली आहे. महिलांसाठी आत्मनिर्भर व सक्षम बनवण्यासाठी अनेक योजना त्यांनी या अर्थसंकल्पात आणल्या आहेत. तसेच प्रधानमंत्री आवास योजनेचे वृद्धीकरण करून २ कोटी घरे देण्याचा निर्णय आजच्या अर्थसंकल्पात घेण्यात आला आहे. खऱ्या अर्थाने रोटी, कपडा व मकान या सुविधा जनतेला पुरवणारा हा अर्थसंकल्प आहे. स्किल डेव्हलपमेंटला प्राधान्य देताना तरुणांना स्वतःच्या पायावर उभे राहता यावे यासाठी ५० वर्षांत परतफेड करता येईल अशी बिनव्याजी कर्ज योजना सुरु करण्यात आली आहे, त्यासाठी १ लाख कोटींची तरतूद केली आहे. आयआयटी, आयआयएम मध्ये वाढ होणार असल्याने चांगले उच्च शिक्षण घेऊन इच्छिणाऱ्या युवकांना लाभ मिळेल. इलेक्ट्रिक वाहनांना प्रोत्साहन, घरांवरील सोलर पॅनल्सच्या माध्यमातून १ कोटी घरांना महिन्याला ३०० युनिटपर्यंतची वीज मोफत पुरविणे या निर्णयांमुळे देशाला विकासाची एक नवी ऊर्जा मिळेल. तसेच देशातील दळणवळण व पायाभूत सुविधांसाठी ११ लाख ११ हजार १११ कोटींची तरतूद या अर्थसंकल्पात करण्यात आलेली आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात इन्फ्रास्ट्रक्चरमध्ये वाढ झाल्याने भारताची अर्थव्यवस्था मजबूत होईल व माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भारताला महासत्ता बनवण्याच्या आणि देशाला ५ ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनवण्याच्या त्यांच्या लक्ष्याच्या दिशेने वेगाने वाटचाल सुरु होईल, असेही मुख्यमंत्र्यांनी नमूद केले आहे.

## मौजे बोथी येथील राशन दुकानदारांवर चौकशी करून तात्काळ कारवाई करा - शेख आरीफ निमटेककर जिल्हाधिकारी यांना निवेदनाद्वारे केली मागणी

उमरी:- तालुक्यातील मौजे बोथी येथील राशन दुकानदार शंकर वाघे यांची चौकशी करून तात्काळ कारवाई करावे या अनुषंगाने झुंजार क्रांती सेनेचे मराठवाडा संपर्क प्रमुख शेख आरीफ निमटेककर यांनी जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन कारवाई करण्याची मागणी केली आहे सविस्तर वृत्त असे की बोथी गावामध्ये राशन दुकानदार हे जाणून बुजून गावातील गोरगरीब लोकांना राशन देत नाही यामुळे नागरीकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. गावातील नागरिक राशन दुकानावर गेल्यावर त्यांना सांगतात,की तूमचे नावाने राशन मिळाले नाही, तूमचे नाव यादीमध्ये आले नाही,तसेच तुम्ही तहसीलदार यांना भेटा तरच तुम्हाला राशन मिळेल, असे सांगून लोकांना माघारी पाठवित असतात.राज्यात चालू असलेल्या शासन देत असलेल्या तांदूळ, गहू व साखर, दाळ हे धान्य आलेले नाही,असे सांगतात व मौजे बोथी येथील राशनचे धान्य व बराच माल मौजे तुराटी येथे साठवून ठेवून तिथून ते काही





माल छोट्या मालवाहू टेम्पो द्वारे बोथीला आणुन मोजक्या लोकांना वाटप करतात आणि राहिलेला माल थेट काळ्या बाजारात विक्रीसाठी नेला जातो त्यामुळे राशन वाटप करत नाहीत असे गावातील नागरीकांनी सांगितले असे मत झुंजार क्रांती सेनेचे मराठवाडा संपर्क प्रमुख शेख आरीफ निमटेककर यांनी आमच्या प्रतिनिधींशी बोलताना म्हणाले ते असेही म्हणाले की आम्हाला बोथी गावातील लोकांनी फोन केला असता आम्ही सामाजिक बांधिलकी म्हणुन आम्ही गावात गेलो असता सदरील दुकानात राशनच नव्हते आणि गावात दुपारी दवंडी दिली की आजच राशन भेटणार उद्या माल संपला तर तुम्ही जबाबदार अशा प्रकारे दवडीं राशन दुकानदार शंकर वाघे यांच्या व्दारे देण्यात आली होती आणि गावकरी आले तर दुकानात माल नसल्याने गावातील नागरिकांनी सविस्तर हकीकत सांगीतली तर सगळा प्रकार खरा होता.आम्ही राशन दुकानदार यांना विचारणा केली असता त्यांनी सांगितले की मला प्रत्येक पोत्यात सहा ते सात किलो धान्य कमी येते म्हणून मी अशा प्रकारे अडजेस्ट करतोय असे सांगितले यामुळे गावातील गोरगरीब लोकांना याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे त्यासाठी मेहरबान साहेबांनी मौजे बोथी येथील राशन दुकानदार शंकर वाघे यांची चौकशी करून तात्काळ त्यांचा परवाना रद्द करून त्यांच्यावर योग्य ती कारवाई करावी अशी विनंती मा जिल्हाधिकारी नांदेड यांच्याकडे लेखी निवेदन देऊन केली आहे. जोपर्यंत बोथी येथील नागरिकांना न्याय मिळणार नाही तोपर्यंत झुंजार क्रांती सेनेच्या वतीने हा लढा चालू राहील असे मत शेख आरीफ निमटेककर यांनी व्यक्त केले.

## मराठवाड्यातील प्रमुख शहरे नांदेड व लातूरला रेल्वे मार्गाने थेट जोडण्याची नितांत गरज आहे.

लातूर-नांदेड मार्गावर दररोज मोठ्या प्रमाणात दळणवळण आहे. रस्ते मार्गाने हे अंतर सुमारे १४४ किलोमीटर असून, पूर्णा, परभणी, परळी, लातूर रोड मार्गे रेल्वे मार्गाने हे अंतर २१२ किलोमीटर आहे. या मार्गावर धावणाऱ्या रेल्वे गाड्यांना हा प्रवास पूर्ण करण्यासाठी साधारणतः सहा तासांचा कालावधी लागतो. रस्ते वाहतुकीच्या तुलनेत रेल्वे वाहतूक स्वस्त व वेगवान असल्याने नांदेड व लातूर दरम्यान नवीन रेल्वे मार्ग प्रकल्प मंजूर झाला पाहिजे, अशी आमची मागणी आहे.



या दोन्ही शहरांना सरळ रेषेत जोडणारा रेल्वे मार्ग टाकल्यास त्याचे अंतर साधारणतः १०० किलोमीटर असेल. त्यामुळे ताशी किमान १०० किलोमीटर वेगाने धावणारी रेल्वे जेमतेम सव्वा तासांत नांदेडहून लातूरला पोहचू शकेल. या रेल्वे मार्गामुळे नांदेड ते पुण्यामधील रेल्वे अंतर कमी होऊन प्रवाशांचा तसेच मालवाहतुकीचा वेळ आणि पैसा वाचू शकेल. केंद्र सरकारने या प्रकल्पाला मान्यता दिल्यास ५० टक्के खर्च उचलण्याची राज्य शासनाची तयारी आहे. या रेल्वे मार्गामुळे नांदेड, लातूर तसेच परभणी जिल्ह्यातील अर्थकारणाला अधिक गती मिळणार असल्याने या प्रकल्पासाठी सर्व राजकीय पक्षांनी तसेच केंद्र आणि राज्य सरकारने समन्वयाने काम करण्याची आवश्यकता आहे.

## केंद्रीय अर्थसंकल्पात पुन्हा घोषणांचा पाऊस

लातूर : प्रतिनिधी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी २०२४-२५ साठी भारताचा अंतरिम अर्थसंकल्प सादर केला. लोकसभेची निवडणुक डोळ्यासमोर ठेवुन हा अर्थसंकल्प सादर केल्याने त्यात केवळ घोषणांचा पाऊस होता. कही खुषी, कही गम, असे म्हणण्यालासुद्धा फारसा वाव नाही. देशाची वास्तविक आर्थिक परिस्थिती समोर न आणता भ्रामक आणि दिशाभूल करणारा हा अंतरिम अर्थसंकल्प असल्याची प्रतिक्रिया मान्यवरांनी व्यक्त केली. ती अशी अर्थसंकल्पात सर्व घटकांचा भ्रमनिरास केंद्र सरकारने आगामी लोकसभा निवडणुका समोर ठेवून फक्त घोषणांचा पाऊस पाडला आहे. मागच्या अर्थसंकल्पात शेतकरी कल्याण मंत्रालयाला सव्वा लाख कोटी रूपये देण्याची घोषणा केली. मात्र उद्दिष्टपूर्ती बाबत मौन बाळगले असून घोषणा करणारे हे केन्द्र सरकार आहे मागच्या घोषणाचा विसर तर पुढच्या घोषणाचा पाऊस पडत असून सर्वसामान्य लोकाना कुठलाही दिलासा नाहीं शेतक-यांच्या मालाला किंमत नाहीं, गॅस पेट्रोल डिझेल दर गगनाला भिडले आहेत. त्यामुळें आजचा अर्थसंकल्प म्हणजे सर्व घटकांचा भ्रमनिरास झाला आहे.- दिलीपराव देशमुख, माजी अर्थ राज्यमंत्री सहकार महर्षी महाराष्ट्र राज्य केंद्रीय अर्थसंकल्पातून फक्त स्वप्नरंजनच! केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीताराम यांनी आज सादर केलेला अंतरिम अर्थसंकल्प म्हणजे निवडणुका डोळ्यासमोर ठेवून केलेला फक्त घोषणांचा पाऊस आहे. कोणतेही भरीव, ठोस नियोजन नसताना मोठे स्वप्नरंजन मात्र या अर्थसंकल्पातून केले आहे. महागाई आणि बेरोजगारी यासह विविध समस्यामुळे देशातील जनता मोठ्या अडचणीत आलेले आहे. या परिस्थितीत देशात बेरोजगारी कमी करण्याच्या दृष्टीने उपयोजना न करताच युवा वर्गासाठी खूप कांही केल्याची बढाई या अर्थसंकल्पात मारण्यात आली आहे.देशाला तेलबियाच्या बाबतीत आत्मनिर्भर करण्याच्या दृष्टीने सरकारने मोठे कार्य करीत असल्याचे अर्थसंकल्पाच्या माध्यमातून सांगितले गेले असले तरी सोयाबीन आणि इतर तेलबियाचे कधी नव्हे एवढे भाव सध्या कोसळलेले आहेत, परिणामी शेतकरी पुन्हा या तेलबियांची लागवड करणार नाहीत अशीच त्यांची मानसिकता बनलेली आहे. या परिस्थितीत देश कसा आत्मनिर्भार होणार हा प्रश्न आज उपस्थित होतो आहे. आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, जाहीरनाम्यात दिल्याप्रमाणे फक्त आश्वासनेच या अर्थसंकल्पात दिली गेली आहेत, मागच्या वेळी केलेल्या घोषणाची प्रतिपूर्ती न करता, या वर्षी जनतेला पुन्हा नव्याने आश्वासने दिली गेली आहेत. - अमित विलासराव देशमुख, माजी मंत्री, आमदार लातूर शहर वाढत्या महागाईचा सरकारला विसर आगामी लोकसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून गरीबी हटवू, ३०० युनिट मोफत वीज देऊ, २ कोटी घरे बांधू अशा लोकप्रिय घोषणा केंद्र सरकारने या अर्थसंकल्पात केल्या. पण, महागाई कमी करू, असे कुठेही म्हंटले नाही. घरगुती गॅस असेलकिंवा पेट्रोल - डिझेलचे दर गगनाला भिडले आहेत. सर्वसामान्यांचे जगणे मुश्कील झाले आहे. तरुणांना नोक-या नाहीत. शेतक-यांच्या मालाला योग्य भाव नाही. पण, याकडे केंद्र सरकारचे साफ दुर्लक्ष झाले आहे. महागाईला आळा घालण्यासाठी त्यांनी कुठलीही तरतूद केली नाही. त्यामुळे सर्वसामान्यांसाठी हा अर्थसंकल्प निराशादायक आणि तितकाच अपेक्षाभंग करणारा आहे. - धिरज विलासराव देशमुख, आमदार, लातूर ग्रामीण फसव्या घोषणांनी शेतक-यांचे भले होणार आहे काय? पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शेतक-यांचे उत्पन्न दुप्पट करतो आणि खर्चाच्या दीडपट हमीभाव देतो, असे आश्वासन दिले होते. ते आजपर्यंत पुर्ण झालेले नाही. आजच्या अंतरिम अर्थसंकल्पात शेतक-यांसाठी नॅनो डीएपीच्या प्रयोगासह इतरही प्रयोगांची घोषणा अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी केली. हे सर्व प्रयोग जुनेच आहेत. नवीन काय? पामतेल आयात करुन त्याचा आनंदाचा शिधा केला. त्यामुळे शेतक-यांचे आर्थिक नुकसान झाले. आज सोयाबीन हमीभावापेक्षा कमी भावाने विकण्याची वेळ शेतक-यांवर आली आहे. त्याामुळे सरकारकडून शेतक-यांना चार पैसे मिळतील याची खात्रीच राहिली नाही.

## संपादकीय....

### तयारी एका मोठ्या स्थित्यंतराची

दावोस येथे भरलेल्या 'वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम'च्या बैठकीच्या सुमारास आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचा कृत्रिम बुद्धिमत्ताविषयक एक अहवाल प्रसिद्ध झाला. त्यात 'एआय'च्या सद्यःस्थितीचे विश्लेषण आणि काही भाकिते वर्तविण्यात आली आहेत. ती भविष्यातील वाटचालीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहेत. या अहवालातील ठळक मुद्यांचा ऊहापोह.मानवी बुद्धिमत्तेप्रमाणे जर मशीन, म्हणजेच संगणकप्रणाली कामे करू लागली तर त्यास कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) म्हणता येईल. त्यात विषयाचे आकलन करून घेणे, काय करायला पाहिजे ते समजणे, त्यानुसार कृती करणे इत्यादी अनेक पैलूंचा समावेश होतो. नजीकच्या काळात प्रसिद्ध झालेले जननशील कृत्रिम बुद्धिमत्ता (जनरेटिव्ह एआय – जेन एआय) हे विस्तृत अशा 'एआय'चाच एक भाग आहे. त्यात नवनवीन गोष्टींची निर्मिती केली जाते. सर्वांना परिचित असे 'चॅटजीपीटी' हे त्याचेच एक रूप, ज्यात भाषा निर्माण केली जाते. इतर काही प्रणालींमध्ये प्रतिमा–चित्रे तर काहींत चक्क चलत् चित्रे निर्माण केली जातात.'एआय'च्या या अफलातून क्षमतेमुळे मानवी जीवनावर, व्यवसायांवर आणि अर्थकारणावर काय काय परिणाम होऊ शकेल, याविषयीची चर्चा आणि भविष्यवेध आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या अहवालात आहे. त्याविषयी अधिक जाणून घेऊयात. खरे तर कोठल्याही गोष्टीविषयी भविष्य वर्तवणे अवघडच असते. विषयाचा पट 'जगावरील परिणाम' इतका व्यापक असेल तर आणखीनच अवघड. पण तरीही गोळा केलेल्या माहितीच्या आधारे, विविध प्रवाहांचा अंदाज ढोबळमानाने काढता येऊ शकतो.'एआय'च्या प्रभावामुळे इतके सर्वदूर आणि आमूलाग्र बदल होणार आहेत (खरे तर सुरुवात झाली पण आहे) की त्याला पुढील औद्योगिक क्रांतीच म्हणावी लागेल. मागील क्रांत्यांप्रमाणेच त्यावेळेसही कार्यक्षमता वेगाने वाढणार आणि तसेच नोकरी–व्यवसायाची हानी होण्याची पण शक्यता आहे. कोठे सकारात्मक आणि कोठे नकारात्मक प्रभाव पडेल.या अहवालानुसार जागतिक पातळीवर जवळपास ४० टक्के नोकरी–व्यवसायांवर 'एआय'चा प्रभाव पडणार आहे. विकसित देशात तर तो जरा जास्तच म्हणजे सुमारे ६० टक्के पण असेल, याचे कारण त्यांच्याकडे मानवी बुद्धिमतेसंदर्भातील नोकऱ्या–व्यवसाय जास्त आहेत. त्यामानाने जे अविकसित देश आहेत, त्यात 'एआय'चा प्रभाव जरा कमी, म्हणजे सुमारे २६ टक्के पडण्याची शक्यता आहे.आता प्रभाव हा सकारात्मक किंवा नकारात्मक असू शकतो. त्याचे प्रमाण ५०–५० टक्के असेल असे वाटते. सकारात्मक म्हणजे उत्पादकता वाढणे, नव्या कल्पनांचे सृजन, क्लिष्ट समस्यांना उत्तरे मिळणे तर नकारात्मक प्रभाव म्हणजे नोकरी–व्यवसायावर गदा, आर्थिक व शेक्षणिक विषमतेत वाढ, इत्यादी. पूर्वीच्या औद्योगिक क्रांतीने स्वयंचलन (ऑटोमेशन) आणल्याने मध्यम–कुशलतेच्या कामांवर प्रभाव पडला होता; पण 'एआय'मुळे उच्च–कुशलतेच्या कामांवर, जसे की संगणकावरील काम, वैद्यकीय तसेच आर्थिक उलाढाल यासारख्या प्रगत क्षेत्रातही मोठा प्रभाव पडणार आहेत. तोचतोचपणा असणारे, सहज शिकता येणारे काम जे असेल ते 'एआय' इमानेइतबारे नक्की करेल.आता फक्त कामकाजाचे स्वयंचलनच नाही तर विचारांचेही 'स्वयंचलन' केले जाणार आहे. काही कामे पूर्णपणे 'एआय' करेल तर काहींत ते मदतनीस म्हणून काम करेल. काही उदाहरणे पाहूयात. सध्या संगणकप्रणाली (सॉफ्टवेअर) कंपन्यांमध्ये खालच्या पातळ्यांवर सॉफ्टवेअर इंजिनियर–१, सॉफ्टवेअर इंजिनियर–२ हे हुद्दे असलेले कर्मचारी प्रोग्रामिंगची कामे करतात.त्यावरील पातळीवर सॉफ्टवेअर लीड (गटप्रमुख) हे त्यांचे प्रोग्रॅम तपासणे, मार्गदर्शन करणे, प्रणाली–प्रक्रिया यांचे नियोजन करणे, अशी जरा प्रगत कामे करतात. सध्या उपलब्ध असलेले 'एआय' पण बऱ्यापैकी प्रोग्रॅमिंग करू लागले आहे. नजीकच्या काळात ते इंजिनीअर १–२ प्रमाणे प्रोग्रॅम लिहायला लागल्यावर मग त्यांचे काय होणार? याकरिता विद्यार्थ्यांना स्वतःला इतके प्रशिक्षित करावे लागेल की, सुरवातीपासूनच 'लीड' सारखे काम हाती घ्यावे लागेल.'एआय'चा प्रभाव फक्त तंत्रज्ञान क्षेत्रातच नाही, तर अन्य सर्जनशीलतेच्या क्षेत्रातही पडायला लागला आहे. 'एआय' कविता लिहितो, चित्र काढतो, गाणे बनवतो अगदी रंजक कथा पण लिहितो. याचाच अर्थ, जर तुम्ही फक्त 'र' ला 'ट' जुळवणारी आशयहीन कविता लिहित असाल किंवा एखाद्या आंग्ल गाण्यावरून प्रभावित होऊन संगीत देणार असाल तर तुमचे काही खरे नाही. नाही का?तुमची सर्जनशीलता, मानवी भावना, आयुष्याचे अस्सल अनुभव, संस्कार, सखोल चिंतन आणावे लागेल, तरच 'एआय'वर मात करता येईल. 'एआय'ला इतक्या वरच्या पातळीवर पोहोचणे होणे अवघड आहे, याचे कारण हे मानवी पैलू त्याला प्रशिक्षित केलेल्या माहिती (डेटा) मध्येच नाहीत (सध्यातरी!!) तर त्याला या गोष्टी कळणारही नाहीत. आढ्यातच नाही तर पोहोऱ्यात कुठून येणार?सर्वसाधारणपणे 'एआय'मुळे मानवी उत्पादकता तर वाढेलच; पण त्यापेक्षा मानवी क्षमतांचा ही विस्तार होईल. ज्यांची उत्पादनक्षमता जास्त त्यांच्याकडे पैशाचा ओघ नक्कीच वाढणार. अशा पद्धतीने काही मोजक्या लोकांच्या–देशांच्या हातात 'एआय'ची शक्ती एकवटली तर त्याचा परिणाम आर्थिक दरी वाढण्यात होणार. अशी ही कारण–परिणामांची मालिकाच सुरु होण्याची शक्यता आहे.'एआय' तंत्रज्ञान आत्मसात करण्यावाचून आता गत्यंतर नाही. हे तंत्रज्ञान विद्यार्थ्यांना, तरुणांना शिकणे एकवेळ शक्य होईल; पण ज्येष्ठांचे तसेच वरिष्ठ कर्मचाऱ्यांचे काय? त्यांनाही नवीन कौशल्ये शिकावी लागणार, नवीन विषय शिकणायची तयारी ठेवावी लागणार.'एआय'ची त्सुनामी रोखणे अवघड आहे, त्यामुळे त्यावर आरूढ होण्यासाठी काय काय करावे लागेल, त्यासाठी आपली किती तयारी आहे हे जोखण्यासाठी या अहवालात एक 'कृत्रिम बुद्धिमत्ता तयारी मानक' (एआय प्रिपेअर्डनेस इंडेक्स) सुचवले आहे. त्यात पुढील चार भाग येतात. 'डिजिटल पायाभूत सुविधा' मध्ये माहिती (डेटा) साठवण, इंटरनेट प्रसार व त्यावर आधारित संगणक प्रणालींचा विकास यासारख्या गोष्टी येतात.

# मालदीवच्या ठिणगीने भडका उडाला की प्रकाशाची निर्मिती झाली?


गेल्या काही दिवसात भारत आणि मालदीव यांच्या ताणल्या गेलेल्या संबंधांनंतर काही जणांची प्रत्यक्षातील तर बऱ्याच जणांच्या मनातील मालदीव सहल रद्द झाली. पंतप्रधान मोदींचा लक्षद्वीप दौरा, समाज माध्यमांतून मालदीव बहिष्काराचे केलेले आवाहन, मालदीवच्या मंत्र्यांची उथळ विधाने आणि त्यांचे निलंबन, राष्ट्राध्यक्ष मोहम्मद मोईज्जू यांचा चीन दौरा आणि नुकताच लष्कर हटविण्यासाठी भारताला दिलेला निर्वाणीचा इशारा या काही उल्लेखनीय गोष्टींमुळे भारतीय उपखंडाबरोबरच जगाचेही लक्ष या मुद्द्यांकडे वेधले गेले. आंतरराष्ट्रीय राजकारणात कोठेही पडलेल्या ठिणगीने भडका किती उडाला यापेक्षा तिच्यामुळे प्रकाशाची किती निर्मिती केली यावर भर देणे अपेक्षित आहे. या लेखात मालदीव प्रकरणात कोणाचे हितसंबंध कसे गुंतले गेले आणि कोणाचे हित जपले गेले याचा धांडोळा घेण्याचा प्रयत्न केला आहे.पहिली गोष्ट म्हणजे मालदीवच्या तुलनेत अवाढव्य आणि दक्षिण आशियातील महाशक्ती असणाऱ्या भारताची मुत्सद्देगिरी! गेल्या काही वर्षात मालदीवमध्ये राष्ट्रवादाच्या नावावर भारतद्वेषी भावनांचा प्रचार जोमात चालू आहे. त्याचाच फायदा घेत सध्या राष्ट्राध्यक्ष असलेल्या मोहम्मद मुईज्जू यांनी गतवर्षी ऑक्टोबरमध्ये सत्ता मिळविली. मालदीवच्या भौगोलिक स्थानाचा विचार करता हिंदी महासागरातील व्यापारी मार्गावर त्याचे अत्यंत महत्वाचे स्थान आहे. त्यात गेल्या काही वर्षात धार्मिक कट्टरता आणि आयसिसचा प्रसार यामुळे मालदीवमधील स्थानिक घडामोडींवर लक्ष ठेवणे भारतासाठी सुरक्षेच्या दृष्टीने क्रमप्राप्त झाले. पुढे जाऊन मालदीवच्या काही राजकारण्यांनी लक्षद्वीपचा दक्षिण भाग म्हणजेच मिनीकॉय बेटांवर दावा सांगण्यास सुरुवात केली. अशा परिस्थितीत मालदीवचे कान टोचणे निकडीचे होते. मात्र सामर्थ्यामध्ये प्रचंड तफावत असताना दुसऱ्या देशाच्या सार्वभौमत्वाला बाधा आणणे हे भारताच्या आंतरराष्ट्रीय प्रतिमेला मारक ठरले असते. भारताकडून अधिकृत पातळीवर कोणत्याही मंत्र्याने अथवा अधिकाऱ्याने मालदीवबद्दल भाष्य केलेले नाही. लक्षद्वीप हे भारताचे अविभाज्य अंग! पंतप्रधान मोदींनी लक्षद्वीपला भेट दिली आणि भारतीय नागरिकांना एक्स या समाजमाध्यमावरून लक्षद्वीपला भेट देण्यासाठी आवाहन केले, एवढीच अधिकृत घडलेली गोष्ट. मात्र मालदीवच्या आर्थिक नाड्या अप्रत्यक्षरीत्या आवळल्या गेल्या आणि त्यांच्या तीन मंत्र्यांनी केलेल्या विधानांनी आगीत तेल ओतले गेले. अधिकृतरित्या काहीही न करता अप्रत्यक्ष इशारा देणे हे भारताच्या कूटनीतीचे पहिले यश! पुढे जाऊन लक्षद्वीपमध्ये मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या गुंतवणुकीची आणि पायाभूत सुविधा निर्मितीची ही सुरुवात असेल. लक्षद्वीपच्या विकासासाठी प्रशासकांनी २०२१ मध्ये चार नियमांचा संच अंमलात आणला. ज्यामध्ये लक्षद्वीप विकास प्राधिकरण, समाजविघातक कृत्यांवर नियंत्रण, पंचायत प्रशासन नियंत्रण अधिनियम आदी गोष्टींचा अंतर्भाव होता. स्थानिकांच्या सहभागाशिवाय लादलेल्या या नियमनाविरोधात लक्षद्वीपच्या रहिवाशांमध्ये मोठ्या प्रमाणावर रोष होता. समाजमाध्यमांवर उठलेल्या वादळानंतर आता कोणत्याही प्रकल्पाला आणि नियमांना होणार विरोध आता राष्ट्रवादाच्या नावाखाली मोडून काढणे नवी दिल्लीला सोपे जाणार आहे.दुसरी बाजू म्हणजे मालदीव बहिष्काराचा समाजमाध्यमांवर उमटलेला प्रतिध्वनी! भारतातील एक्स वापरकर्त्यांची संख्या आहे जवळपास तीन कोटी. गेल्या काही वर्षात राजकीय पक्षांनी देशांतर्गत राजकारणात समाजमाध्यमांचा केलेला वापर तर आपण जाणतोच! मात्र या वेळी एक पाऊल पुढे जात आंतरराष्ट्रीय राजकारणात समाजमाध्यमांचा रचनात्मक कार्यासाठी वापर केला गेला. असे करणे म्हणजे दुसऱ्याच्या वहाणेने विंचू मारण्याचा प्रकार! ईप्सित तर साध्य झाले आणि वरून कोणती जबाबदारीही नाही. यानिमित्ताने समाज माध्यमांनी भारतीय परराष्ट्र धोरणामध्ये थेट भूमिका बजावण्यास सुरुवात



केली मात्र त्याबरोबरच भविष्यात कित्येक उपद्रवी संदेशांनी भारताची पत घसरण्याचा धोका नाकारता येत नाही.तिसरी गोष्ट म्हण मालदीवच्या संतुलनाच्या राजकारणामध्ये आलेली आक्रमकता! स्वातंत्र्यापासून दैनंदिन व्यवहारासाठी भारतावर असलेले अवलंबित्व आणि तथाकथित अंतर्गत हस्तक्षेपाचा काही सामाजिक घटकांचा आरोप यामुळे भारताच्या मदतीला मालदीवमध्ये काही जणांकडून दादागिरी असे संबोधले जाऊ लागले. शीत युद्धाच्या काळात अमेरिका आणि नंतर चीनच्या उदयानंतर या नवीन आशियाई महासत्तेचा आधार घेऊन सर्वच दक्षिण आशियाई राष्ट्रांनी भारताचा हस्तक्षेप मर्यादित ठेवून तुम्ही नसाल तर आम्ही इतरांना बरोबर घेऊ असे सांगत चुचकारण्याचा प्रयत्न केला आहे. विशेषतः चीनचे 'स्ट्रिंग ऑफ पर्ल्स' धोरण आणि 'बेल्ट अँड रोड' प्रकल्प यांमध्ये मालदीवचे सामरिक आणि भौगोलिक स्थान असाधारण आहे. या गोष्टीचा फायदा मालदीवने घेतला नसता तरच विशेष! आंतरराष्ट्रीय पटलावर कोणीही कोणाचाही कायमस्वरूपी मित्र अथवा शत्रू नसतो हे सर्वात मूलभूत सूत्र. मात्र व्यवहार्यता सोडून भारताविषयी असलेला आकस हा गेल्या काही महिन्यातील मालदीवच्या राजकारणाचा केंद्रबिंदू बनला. पुढे जाऊन छोट्या राष्ट्रांना असणारा संसाधनांचा तुटवडा, योग्य आणि अभ्यासपूर्ण सल्ल्याचा अभाव, तात्कालिक फायद्यांना दिलेले प्राधान्य यामुळे मालदीवच्या संतुलनाच्या राजकारणाचे द्वेषाच्या राजकारणात रूपांतरण झाले आहे. या संतुलनाचा पुढचा टप्पा म्हणजे मोदींच्या ट्विटची वेळ! मालदीवच्या राष्ट्राध्यक्ष मुईज्जू यांच्या चीन दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर भारतातून उठलेल्या मालदीव विरोधी लाटेचा परिणाम मालदीवच्या पदरी काही अधिक पडण्यात नक्कीच झाला. नुकताच झालेला द्विपक्षीय मुक्त व्यापार करार हे त्याचेच फलित. या पार्श्वभूमीवर दोन्ही देशांतील सहकार्य सामरिक पातळीला गेल्यास भारतासाठी अधिक अडचणीचे ठरेल.चौथी गोष्ट म्हणजे राष्ट्रवादाचा भारत आणि मालदीव या दोन्ही देशांत निवडणुकीच्या आधी झालेला उद्रेक! हे दोन्ही देश वेगळे असले तरी त्यातील सामाजिक मानसिकतेमध्ये साधर्म्य आहे. २०१९ च्या निवडणुकीमध्ये भारतामध्ये पाकिस्तानचा मुद्दा प्रभावीपणे वापरला गेला तर २०२३ ची मालदीव निवडणूक भारतद्वेषावर आधारित होती. स्थापनेपासून पाकिस्तानच्या लष्कराने देशांतर्गत राजकारणात भारताच्या दहशतीचा बागुलबुवा उभा केला आणि सत्ता ताब्यात ठेवण्यात यश मिळवले. तोच कित्ता आता मालदीव गिरवत आहे. एकूणच, निवडणुकीमध्ये शेजारी राष्ट्राचा बागुलबुवा उभा करणे हा नवा पायंडा दक्षिण आशियाई राष्ट्रांमध्ये पडला आहे.शेवटची आणि सर्वात महत्वाची गोष्ट! मालदीव केवळ निमित्त आहे. दक्षिण आशियाई राष्ट्रांसाठी भारत आणि चीन यामधील संतुलन ही आर्थिक विकासासाठी धोरणात्मक चाचणी आहे. जटिल परस्परावलंबनाच्या काळात लहान राष्ट्रांना स्वतंत्र अस्तित्वासाठी संतुलनाचे राजकारण अनिवार्य बनले आहे. दक्षिण आशियातील बांगलादेश, श्रीलंका, मालदीव, नेपाळ या राष्ट्रांतील देशांतर्गत राजकारणावर नजर टाकली तर लक्षात येईल की या देशांमध्ये एक राजकीय पक्ष भारताचा पाठीराखा तर दुसरा चीनधार्जिणा आहे. जो पक्ष सत्तेवर येईल त्याप्रमाणे त्यांचा भारताकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलत आहे. संतुलनाचे राजकारण मुत्सद्देगिरीपुरते मर्यादित न राहता तो देशांतर्गत राजकारणातील कळीचा मुद्दा बनत आहे. एकूणच मुद्द्यांचा प्रवाह देशांतर्गत राजकारणातून मुत्सद्देगिरीकडे आणि परराष्ट्र धोरणाकडून निवडणुकांद्वारे सरकार ठरविण्याकडे असा दुहेरी होत आहे. एकेकाळी दूरदर्शी विचारांनी संपन्न असणारे परराष्ट्र धोरण आता केवळ सत्तेच्या बदलानुसार क्षणभंगुर ठरत आहे. अशा अस्थिर धोरणात्मक वातावरणात दक्षिण आशियातील सर्वात महत्वाचा देश म्हणून भारताला शेजारील राष्ट्रांविषयीच्या धोरणांबद्दल पुन्हा विचार करण्याची गरज आहे. आगामी काळ हा दक्षिण आशियासाठी अधिक संघर्षपूर्ण असेल. चीनची विस्तारवादी भूमिका आणि तैवान गिळंकृत करण्याची मनीषा यामुळे लहान राष्ट्रांना संतुलनाच्या राजकारणात अधिकाधिक वाव मिळणार आहे. चीनने तैवानसाठी उचललेले एक पाऊल लहान आणि मोठ्या राष्ट्रांच्या आजपर्यंतच्या संबंधांसाठी विभंगरेषा ठरण्याची सुरुवात असेल. त्यावेळी लहान राष्ट्रांना सुरक्षेसाठी स्वतःच पुढे यावे लागेल. बाकी मालदीवपुरता विचार करायचा झाला तर गुरगुरणे ही त्याची अपरिहार्यता आहे. त्यांना किती चुचकारायचे ही भारतीय परराष्ट्र नीतीची परिपक्वता! सत्ता बदलत राहील आणि धोरणंदेखील. नुकताच माले या मालदीवच्या राजधानीत महानगरपालिकेच्या निवडणुकीत मुईज्जू यांच्या पीपल्स नॅशनल काँग्रेस या पक्षाचा झालेला पराभव आणि भारत समर्थक मालदीवी डेमोक्रॅटिक पक्षाचा विजय ही सत्ताबदलाची एक झलक. मात्र अलिप्ततावाद आणि पंचशील तत्वे ही दक्षिण आशियासाठी, शांततापूर्ण सहकार्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे राहिली आहेत. त्यांच्याशी केलेली प्रतारणा क्षेत्रीय सौहार्दासाठी घातक ठरेल.

# साहित्य वजा संमेलन?

अमळनेरच्या संमेलनातही यातल्या काही विचारांच्या साहित्यिकांना स्थान देण्याचा प्रयत्न केला आहे पण त्यांची उपस्थिती मर्यादित राहील याचीही काळजी घेतल्याचे स्पष्टपणे दिसते.संमेलनाच्या व्यासपीठावर एवढ्या राजकीय व्यक्तींची उपस्थिती कशासाठी, संमेलनाच्या ठिकाणी शस्त्रांचे प्रदर्शन का हे प्रश्न आपण कधी विचारणार आहोत की नाही?सांधा बदलताना : जुडे वाद–संवाद तो हितकारी अगदी अलीकडे म्हणजे करोनापूर्व काळात झालेल्या उस्मानाबाद (आताचे धाराशिव) येथील साहित्य संमेलनातील घटना. तेव्हा राज्याचे सांस्कृतिकमंत्री होते अमित देशमुख. 'नेमेची येतो पावसाळा' या उक्तीप्रमाणे तेव्हाही संमेलनाच्या व्यासपीठावर मंत्री, राजकारण्यांनी जाऊ नये असा वाद उफाळला होता. त्याची दखल घेत देशमुख संपूर्ण संमेलनभर प्रेक्षकांच्या खुर्चीत बसले. तेव्हा त्यांनी दाखवलेला संयम व समजूतदारपणा अनेकांना भावला. या पार्श्वभूमीवर आता होत असलेल्या अमळनेरच्या संमेलनाकडे बघा. एकूण आठ मंत्री यात नुसती हजेरी लावणार नाहीत तर व्यासपीठावर विराजमान होणार आहेत. हा बदल लक्षात घेण्याजोगा आहे. यावेळी एकच गोष्ट घडलेली दिसत नाही ती म्हणजे हा 'हजेरी'चा प्रश्न उपस्थित करण्याचे धाडस कुणी दाखवले नाही. एकूणच संमेलन व्यवहारावर विशिष्ट विचारसरणीची पकड घट्ट होत असल्याचे दिसल्याने हे घडले असेल का? विचारसरणीची ही मगरमिठी अशीच घट्ट होत राहिली तर या संमेलनातून नेहमी दिसणाऱ्या सर्वसमावेशकतेचे काय?राजकारण्यांनी अशा व्यासपीठावर जावे की नाही हा वाद तसा जुना. प्रत्येक वेळी तो उद्भवत आला असला तरी अनेक नेते या व्यासपीठावर जात राहिले आहेत. कधी सरकारचे प्रतिनिधी म्हणून तर कधी पक्षाचे प्रमुख म्हणून! हा व्यवहार हाताळणाऱ्या घटक संस्था, आयोजक आणि महामंडळही राजकीय नेत्यांना आवर्जून स्थान देत राहिले. कधी यामागे सरकारी निधी मिळावा अशी याचना होती तर कधी नेत्यांना कशाला दुखवायचे असा मानभावीपणा. या 'आतल्या' बाजूवर पांघरुण घालत संमेलन पार पाडणाऱ्या साऱ्यांनी नेत्यांच्या या हजेरीचे स्वरूप सर्वपक्षीय राहील याची काळजी घेतली. काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या सत्ताकाळात नागपुरात झालेल्या संमेलनात डावे नेते ए. बी. बर्धन यांना मानाचे स्थान दिले गेले होते. नंतरच्या काळातही शरद पवार, नितीन गडकरी यांची उपस्थिती अनेक ठिकाणी दिसली. सत्ता कुणाचीही असो, त्याचा या हजेरीवर परिणाम झाला नाही. या पार्श्वभूमीवर अमळनेरच्या संमेलनाकडे बघितले तर ही सर्वसमावेशकता वजा झाल्याचे स्पष्टपणे दिसते. असे का घडले असेल? विशिष्ट विचारसरणीचा आग्रह धरणाऱ्यांकडून तंबी मिळाली असेल का? सध्या सक्रिय असलेली ही विचारसरणी सत्तेत नव्हती तेव्हाही तिला मानणाऱ्या साहित्यिकांना संमेलनाच्या व्यासपीठावर स्थान मिळत होते. डावे, उजवे, पुरोगामी, बहुजन, दलित अशा सर्वांचा वावर अनेक संमेलनात साऱ्यांनी बघितला आहे.अमळनेरच्या संमेलनातही यातल्या काही विचारांच्या साहित्यिकांना स्थान देण्याचा प्रयत्न केला आहे पण त्यांची उपस्थिती मर्यादित राहील याचीही काळजी घेतल्याचे स्पष्टपणे दिसते. असे का याचे उत्तर महामंडळ व आयोजकांवर पडलेल्या मगरमिठीत सामावलेले. ही मिठी घट्ट होत असल्याचे जाणवले ते गेल्या वर्षी वर्धेच्या संमेलनात. अध्यक्षपदाच्या शर्यतीत आघाडीवर असलेल्या सुरेश द्वादशीवारांचे नाव कापा तरच मदत करू असा निर्वाणीचा संदेश सत्तेच्या वर्तुळातून गेल्यावर महामंडळाने चक्क नांगी टाकली. त्यामुळे आनंदित झालेल्या सत्तेने संमेलनाचा निधी ५० लाखावरून चक्क दोन कोटीवर नेला. वाफाळलेल्या चहासोबत वायफळ गप्पा करत संमेलन यशस्वी कसे करायचे या विवंचनेत कायम असणाऱ्या महामंडळ व आयोजकांसाठी ही चक्क लॉटरीच होती.वर्धेत संमेलन असल्याने अध्यक्ष गांधीवादीच हवा हा तर्क तत्त्वत: मान्य असणाऱ्या उजव्या विचारसरणीकडे योग्य व्यक्ती नव्हती म्हणून मग नरेंद्र चपळगावकरांच्या नावावर सहमती झाली. हे सारे घडवून आणले ते मुंबईतील संस्थेच्या माध्यमातून महामंडळात हळूच शिरकाव केलेल्या लेखक नसलेल्या एका कार्यकर्त्याने. तेव्हापासून सरकारच्या दावणीला बांधलेल्या



महामंडळाने हा कार्यकर्ता म्हणेल तसे असा नरमाईचा सूर लावला आहे. आताचे संमेलन होतेय ते याच कार्यकर्त्याच्या आग्रहामुळे. तेही त्याच्याच मूळ गावात. असे संमेलन गावाकडे वळवण्यात काहीही गैर नाही. मात्र त्यावर एका विशिष्ट विचारांचा प्रभाव राहील हा दुराग्रह चुकीचा.अमळनेरच्या बाबतीत नेमका तोच पदोपदी जाणवतो. मग ते सत्यनारायणाची आठवण करून देणारे बोधचिन्ह असो की अध्यक्षपदी रवींद्र शोभणेंची निवड. याच शोभणेंनी अगदी अलीकडे 'उच्चवर्णीयांनी साथ दिल्यामुळेच माझ्यासारखी बहुजन समाजातील व्यक्ती मोठी होऊ शकली' अशा आशयाचे विधान केले. ते करताना त्यांनी बहुजन साहित्यिकांच्या कंपूशाहीवर कडाडून टीका केली. अध्यक्षपदी त्यांची झालेली निवड व नंतरची ही वक्तव्ये या विचारसरणीचे वर्चस्व किती वाढत आहे याची जाणीव करून देतात. संमेलनस्थळ आम्ही म्हणू ते, अध्यक्ष आम्ही म्हणू तोच, निमंत्रित आम्ही ठरवू तेच हा सारा घटनाक्रम सर्वसमावेशकतेला बाधा आणणारा नाही काय? ऐकत नसाल तर निधी मिळणार नाही अशी प्रत्यक्ष धमकी न देता आधीपासूनच कणाहीन असलेल्या महामंडळाला लोटांगण घालायला लावता येते हेच यातून दिसले.संमेलनाचे उद्घाटन इतर भाषेतील एखाद्या मान्यवर साहित्यिकांकडून करवून घेण्याची प्रथा गेल्या अनेक वर्षांपासूनची. त्याला यंदा पहिल्यांदा छेद दिला गेला. बोलावले कुणाला तर सुमित्रा महाजन यांना. आत्मचरित्र (जे आजकाल कुणीही लिहितो) वगळता त्यांचे साहित्यक्षेत्रातील योगदान काय? आयुष्यभर त्या एका पक्षाच्या नेत्या म्हणूनच वावरल्या. त्या आदरणीय आहेत यात वाद नाही. तरीही त्यांना प्रमुख पाहुणे करून उद्घाटनाचा मान अस्सल साहित्यिकाला देता आला असता पण तसे घडले नाही. या विचारसरणीकडे उत्तुंग व्यक्तिमत्त्वाचे साहित्यिक नाहीत असा निष्कर्ष कुणी काढला तर त्यात गैर काय? सत्ता आमची त्यामुळे सर्व व्यासपीठावर वावरही आमचाच हा आग्रह कंपूशाही नाही तर आणखी काय दर्शवतो?याच संमेलनात शिवकालीन शस्त्रांचे प्रदर्शन भरवण्यात आले आहे. लेखणी हेच शस्त्र अशी धारणा रूढ असलेल्या साहित्यक्षेत्रात हे प्रदर्शन कशासाठी? यातून महामंडळाला आपल्या तालावर नाचवणाऱ्या या कार्यकर्त्याला नेमके काय साधायचे आहे? हे प्रदर्शन साने गुरुजींच्या विचारधारेला अभिप्रेत आहे असे समजायचे काय? आजवर कोणत्याच संमेलनात शस्त्रांचा गवगवा कधी झाला नाही. भविष्यात संमेलनाला येताना साहित्यिकांनीसुद्धा लेखणी न आणता तलवारी घेऊन याव्यात असे महामंडळाला सुचवायचे आहे का? जहाल व कडव्या विचारसरणीच्या लोकांमध्ये शस्त्रांविषयी आकर्षण असतेच. आजकाल तर साधे उद्यान विकसित करायचे असेल तरी तिथे एखादे शस्त्र देखावा म्हणून ठेवले जाते. सामान्यांना त्यांचा शत्रू कळावा व त्यातून त्यांच्या बाहू फुरफुराव्यात हीच अपेक्षा यामागे असते. तोच प्रयोग संमेलनस्थळी करण्याचे प्रयोजन काय? शिवकालीन शस्त्रे हा अनेकांसाठी आदराचा विषय असू शकतो. पण प्रतिभेच्या मेळाव्यात त्याचे प्रदर्शन कशासाठी?

यावेळच्या संमेलनात चर्चेसाठी निवडल्या गेलेल्या विषयांवर एक नजर टाकली तरी हे संमेलन वास्तवापासून किती दूर गेले आहे याचे दर्शन ठळकपणे होते. वर्धेतून आध्यात्मिक लोकशाहीपासून सुरू झालेला हा प्रवास आता सद्या:स्थितीपासून वाचक व प्रेक्षकांना आणखी दूर नेणारा ठरतोय. अस्वस्थ तरुणाई, बेरोजगारांचे प्रश्न, राज्याचा विचार केला तर राजकीय अस्थिरता, आरक्षणाचा पेटलेला प्रश्न, शेतकरीवर्गातील अस्वस्थता या ज्वलंत विषयांवर साहित्यिक चर्चाच करणार नसतील तर या संमेलनाला अर्थ काय? चावून चोथा झालेले विषय प्रत्येक संमेलनात चर्चेला येत असतील व साहित्यिक त्याच ऐतिहासिक सत्यात रमत असतील तर मग संमेलन हवेच कशाला? वास्तवावर चर्चा करायची म्हटली की टीकाटिप्पणी आलीच. तीच विद्यमान विचारसरणीला नको असेल म्हणूनच कदाचित हा घाट घातला असावा. पाने, फुले, फळे, संस्कार हेच खरे साहित्य असे मानणाऱ्यांच्या हाती सूत्रे गेल्यावर दुसरे दिसणार तरी काय? महामंडळावर ताबा मिळवलेल्या या विचारसरणीचा महत्त्वाचा गुण आहे तो झापडबंदपणा. नेमके त्याचेच दर्शन या संमेलनात होत असेल व अजूनही मोठ्या संख्येत जमणाऱ्या गर्दीसमोर भाषणे देण्याच्या संधीत सत्ताधारी समाधान शोधत असतील तर या संमेलनाने मूळ उद्देशापासून केव्हाच फारकत घेतली असाच निष्कर्ष निघतो.

# पी.एम. विश्वकर्मा योजनेच्या १०१ कौशल्य केंद्रांचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शुभारंभ

मुंबई,दि. १ : पारंपारिक कारागीर आणि हस्तकलेला ओळख प्राप्त करून देणारी पी.एम. विश्वकर्मा सन्मान योजना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशात सुरू केली आहे.महाराष्ट्र या विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजनेतही अग्रेसर राहील,असा विश्वास आहे.या योजनेत जास्तीत जास्त होतकरू तरुणांनी सहभागी व्हावं. या योजनेअंतर्गत २०२८ पर्यंत, राज्यात साधारण तीन लाख कारागीरांना विकासाच्या प्रवाहात आणणार असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

सह्याद्री अतिथी गृह येथे पी.एम.विश्वकर्मा कौशल्य योजनेंतर्गत राज्यातील१०१ केंद्रांच्या शुभारंभ प्रसंगी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे बोलत होते. यावेळी कौशल्य,रोजगार,उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा,महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीच्या आयुक्त निधी चौधरी,महाराष्ट्र खादी ग्रामोद्योग मंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आर.विमला,राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी वेद मनी,केंद्रीय कौशल्य विकास विभागाचे सचिव अतुल तिवारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. कार्यक्रमाला कौशल्य विकास विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. अपूर्वा पालकर, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाचे संचालक दिगांबर दळवी,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाचे संचालक योगेश पाटील,राज्यातील १५ जिल्ह्यातील स्थानिक लोकप्रतिनिधी, विश्वकर्मा केंद्राचे संचालक, स्थानिक शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे अधिकारी, प्रशिक्षणार्थी दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले की, महाराष्ट्र या पी.एम.विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजनेतून नवनवीन स्टार्टअपही सुरू व्हावीत. या स्टार्टअपनी जागतिक स्पर्धेत उतरावं. पी.एम.विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजेनेच्या पहिल्या टप्प्यात १५ जिल्ह्यातील १०१ तुकड्यांना आपण हे प्रशिक्षण देतोय. आगामी काळात अन्य जिल्ह्यांतही या प्रशिक्षणाचा विस्तार करण्यात येईल. त्याला सर्वतोपरी पाठबळ दिलं जाईल.कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागानंही आपल्या नावासारखंच काम सुरु केलंय असे म्हणून त्यांनी मंत्री श्री.लोढा यांचे कौशल्य उपक्रम नवीन राबविल्याबद्दल अभिनंदन केले.

मुख्यमंत्री म्हणाले की,महाराष्ट्रात आपण कौशल्य विकासासाठी मुंबईसह, नागपूर, पुणे इथं कौशल्य विकास विद्यापीठ सुरु केली आहेत. राज्यात नमो रोजगार अभियानांतर्गत नमो महारोजगार मेळाव्यांचं आयोजन करतो आहोत. नागपूर मध्ये असा यशस्वी मेळावा आयोजित केला गेलाय. लवकरच ठाण्यामध्ये हा मेळावा होणार आहे. महाराष्ट्र हे उद्योगाभिमुख, उद्योजकतेला प्रोत्साहन आणि प्राधान्य देणारं राज्य आहे. त्यामुळंच आपल्या राज्यात मोठ्या प्रमाणात औद्योगिक गुंतवणूक येतेय. दावोस मध्ये ३ लाख ८३ हजार कोटींचे सामंजस्य करार केले असून यातून अनेक रोजगार निर्माण होतील असा विश्वास आहे असेही ते म्हणाले.

प्रधानमंत्री विश्वकर्मा कौशल्य योजनेंतर्गत राज्यातील१०१ केंद्रांचा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते रिमोट द्वारे बटन दाबून शुभारंभ करण्यात आला.

राज्यात अधिकाधिक कुशल मनुष्यबळ निर्माण करणार : मंत्री मंगलप्रभात लोढा

कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा म्हणाले,कौशल्य विकास विभाग राज्यात जास्तीत जास्त कुशल मनुष्यबळ विकसित करण्यावर भर देत असून,राज्यात ५११ प्रमोद महाजन कौशल्य विकास केंद्रे सुरू झाली आहेत.आज पी.एम.विश्वकर्मा सन्मान योजना देखील १५ जिल्ह्यात १०१ ठिकाणी सुरू करत आहोत.यापुढे जावून ही संख्या वाढविण्यात येईल.नमो महारोजगार मेळावे, रोजगार मेळावे यातून अधिकाधिक रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देवून प्रत्येक हाताला काम देण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे.

कौशल्य विद्यापीठाचा एन.एस.डी.सी. आणि रूबिका फ्रांस सोबत सामंजस्य करार

महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाने (छडऊउ) राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळ बरोबर कौशल्य विकासाच्या विविध कार्यक्रम राबविण्यासाठी सामंजस्य करार केला. प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण व प्रमाणपत्र तसेच क्रेडिट ट्रान्सफरचाही समावेश आहे.

महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाने रुबिका फ्रांस या जागतिक दर्जाच्या विख्यात डिझाईन संस्थेसोबत सामंजस्य करार केला. या करारा अंतर्गत विद्यापीठाने या अंतर्गत डिझाईन, अनिमेशन, गेमिंग, यू आय स्किल्स या अभ्यासक्रमाचे तसेच आंतरराष्ट्रीय प्लेसमेंट, स्टूडंट एक्चेंज चा अंतर्भाव असून यातून विद्यार्थांना डिझाईन क्षेत्रातील जागतिक दर्जाच्या संधी उपलब्ध होतील.

प्रधानमंत्री विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजना प्रमुख वैशिष्ट्ये

प्रधानमंत्री विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजनेमध्ये अठरा व्यवसायामध्ये सुतार, होड्या बनवणारे, हत्यारे बनवणारे, लोहार, टाळा बनवणारे, हातोडा आणि टूलकिट बनविणारे, सोनार, कुंभार, मूर्तीकार, चांभार, मेस्त्री, चटई आणि झाडू बनवणारे, पारंपारिक बाहुल्या आणि खेळणी बनवणारे, न्हावी, हार बनवणारे, धोबी, शिंपी, माशाचे जाळे विणणारे कारागीर या कारागिरांना या योजनेचा लाभ मिळणार आहे.

या विविध १८ व्यवसायांच्या लाभार्थ्यांना ५ दिवसांचे कौशल्य विकास प्रशिक्षण देण्यात येणार आहे. लाभार्थ्यांना संबंधित व्यवसायाच्या टूलकिटसाठी १५ हजार रुपयांचे ई-व्हाऊचर विद्यावेतन देण्यात येणार आहे. प्रशिक्षणानंतर पात्र लाभार्थ्यांना एक लाख रकमेचे ५ टक्के व्याजदराने कर्ज मिळेल.पहिल्या हप्त्याच्या कर्जाची परतफेड नियमित असल्यास लाभार्थ्यांना पुढील रू. दोन लाख रकमेचे ५ टक्के व्याजदराचे कर्ज मिळेल. वेगवेगळ्या तुकड्यांमध्ये प्रत्यक्ष प्रशिक्षणास सुरुवात करण्यात येणार आहे.राज्यातील १५ जिल्ह्यांमधील १०१ प्रशिक्षण केंद्रामध्ये प्रत्यक्ष प्रशिक्षणात सुरुवात करण्यात येणार आहे.

राज्यातील जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली विश्वकर्मा योजनेसाठी जिल्हा अंमलबजावणी समिती गठीत झाली आहे. या योजनेत १८ व्यवसायाच्या लाभार्थ्यांना त्यांची नोंदणी जवळच्या नागरी सेवा केंद्रात करायचे आहे. ग्रामपंचायत व शहरांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांनी या योजनेबद्दल जनजागृती करावी. या योजनेअंतर्गत २०२८ पर्यंत संपूर्ण भारतातील ३० लाख महाराष्ट्रात साधारण तीन लाख लाभार्थ्यांचे उद्दिष्ट आहे.

## इतिहासात भीमा कोरेगाव सारखा स्वाभिमानी लढा कोणीही दिला नाही

किनवट /ता.प्रतिनिधी.शेख शौकत :- तथागत भगवान गौतम बुद्ध आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारखे महामानव भारतभूमीत जन्माला आल्यामुळे येथे समता स्वातंत्र्य बंधुत्वाची समाज व्यवस्था निर्माण झाल्याचे स्पष्ट करत देशाच्या इतिहासात भीमा कोरेगाव सारखा स्वाभिमानी लढा कोणीही दिला नाही असे मौलिक प्रतिपादन हिंगोली लोकसभेचे खा हेमंत पाटील यांनी किनवट येथे केले आहे.




आंबेडकरी समाजाच्या वतीने दि २८ जानेवारी २०२४ रोजी स्मृती,मनोज हुतात्मा गोंडराजे शंकरशाह रघुनाथशहा येथील मैदानावर पहिल्यांदाच २०६ व्या भीमा कोरेगाव दिनानिमित्त शौर्य महोत्सवाचे भव्य स्वरूपात आयोजन केले होते त्याप्रसंगी खा हेमंत पाटील प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. मंचावर कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष प्राचार्य मोहनराव मोरे दराटीकर, माजी नगराध्यक्ष अरुण आळणे, करुणा अरुण आळणे, निमंत्रक दत्ता कसबे,विद्यार्थी नेते विकास कुडुमते युवानेते जयवंत वानोळे, माजी नगरसेवक सुरत सातुरवार पूर्णा येथील सुनील भरणे,अजय कदम मनोज तिरमनवार संदीप निखाते सुदर्शन नाईक सुधाकर हलवले ॲड सुनील येरेकर गंगुबाई परेकर सुभाषबाबू नायक राठोड, वसंत राठोड बोधीवृक्ष कदम वंचितचे तालुकाध्यक्ष निखिल वाघमारे सिद्धार्थ वाघमारे, दीपक ओंकार,आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती. प्रारंभी भीमा कोरेगावच्या प्रतीकात्मक विजय स्तंभाला अभिवादन केल्यानंतर कार्यक्रमाला सुरुवात झाली. स्वागत अध्यक्ष प्राचार्य मोहनराव मोरे यांनी उपस्थित मान्यवरांना पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

पुढे बोलताना खा हेमंत पाटील म्हणाले की चीन,अमेरिका,जपान, थायलंड नेपाळ,म्यानमार, भूतान सारख्या राष्ट्रांनी बौद्धधर्माचे तत्त्व अनुसरून अभूतपूर्व प्रगती केली. विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून या देशात समता स्वातंत्र्य बंधुता आणि न्याय या तत्त्वांची प्रस्थापना केली.तथागत भगवान गौतम बुद्ध आणि महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर हे भारतभूमीत जन्माला आले हे आमचे भाग्य आहे. या देशात सत्तेसाठी अनेक लढाया झाल्या परंतु भीमा कोरेगावची लढाई ही स्वाभिमानाची व आत्मसन्मानाची होती. अशी लढाई देशाच्या इतिहासात झाली नसल्याचे खा हेमंत पाटील म्हणाले. स्वागतअध्यक्षीय भाषणातून प्रा मोहनराव मोरे दराटीकर यांनी भीमा कोरेगाव लढाईची विस्तृत माहिती देत वर्णव्यवस्थेवर हल्ला केला. लोकशाही अस्तित्वात येऊन ७५ वर्षे लोटली तरी या देशातील शोषित वंचित व दुर्बल घटकावर जातीय द्वेषभावनेतून अन्याय करण्याचे प्रकार सुरूच आहेत. संविधानामुळे भारत देशातील बहुजनांचे अस्तित्व टिकून आहे. संविधान नष्ट झाले तर मनुस्मृती लागू होऊन पुन्हा गुलामगिरी सहन करावे लागतील.समताधिष्टीत लोकशाही टिकवायची असेल तर दलित आदिवासी बहुजनांनी संघटितपणे लढा द्यावा असे आवाहन त्यांनी केले. माजी नगराध्यक्ष अरुण आळणे विद्यार्थी नेते विकास कुडुमते जयवंत वानोळे दीपक ओंकार बोधीवृक्ष कदम आदींनी त्यांच्या मनोगतातुन भीमा कोरेगावचा इतिहास तसेच फुले शाहू आंबेडकरी चळवळीवर प्रकाश टाकला. आयोजक दयाभाऊ पाटील यांनी प्रास्ताविक भाषणातून कार्यक्रमाच्या आयोजनामागची भूमिका विषद करत १० व ११ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या धम्म परिषदेच्या आयोजनावर नाराजी व्यक्त केली. जागतिक धम्म परिषदेच्या मूळ हेतूला स्वयंघोषित आयोजक व संयोजकाकडून हरताळ फासण्याचे काम सुरु आहे.धम्म परिषद आता राजकीय व आर्थिक हेतूने प्रेरित होत असल्याचे ते म्हणाले.यानिमित्त रात्री ८ वा राष्ट्रीय प्रबोधनकार राहुल आनवीकर, सारेगम लिटल चॅम्पची स्पर्धक कु प्रांजल बोधक आणि ख्यातनाम गायक रॉकस्टार संतोष जोंधळे यांनी सादर केलेल्या बहारदार भीम बुद्ध गीतांनी उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रविराज कानिंदे यांनी केले तर संयोजन समितीचे अध्यक्ष अंकुश भालेराव यांनी उपास्थितांचे आभार मानले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संयोजन समितीचे संयोजक सम्राट कावळे, प्रवीण गायकवाड,तथागत गायकवाड,संघटक राहुल गिमेकर, निखिल कावळे, सत्यशील पाटील, शेख अजमल यांनी परिश्रम घेतले या कार्यक्रमास किनवट माहूर तालुक्यातील हजारो भीम अनुयायी उपस्थित होते.

## तुम्हाला दूध प्यायला आवडत नाही? मग शरीरात कॅल्शियमची पातळी कशी वाढवाल? तज्ज्ञांनी सुचविले हे चांगले पर्याय.

खष धर्जी ऊेप्र´ीं ऊीळपज्ञ चळश्रज्ञ : कॅल्शियमचे सेवन शरीरासाठी खूप जास्त महत्त्वाचे आहे. शरीरात कॅल्शियमच्या कमतरतेमुळे अनेक शारीरिक समस्या निर्माण होतात. कॅल्शियमची मात्रा वाढविण्यासाठी अनेकदा आपल्याला नियमित दूध पिण्याचा सल्ला दिला जातो. कारण- दूध कॅल्शियमचा खूप चांगला स्रोत आहे. काही लोकांना दूध प्यायला आवडत नाही. त्यामुळे ते अनेकदा दूध पिणे टाळतात. अशा लोकांच्या शरीरात कॅल्शियमची कमतरता जाणवते. जर तुम्हीसुद्धा दूध पीत नसाल, तर तुम्ही वेगळ्या पद्धतीने शरीरात कॅल्शियमचे प्रमाण वाढवू शकता. पण, त्यापूर्वी कॅल्शियम आपल्या शरीरासाठी का महत्त्वाचे आहे, ते जाणून घेऊ या. या संदर्भात नवी मुंबई येथील अपोलो हॉस्पिटलच्या न्युट्रिशनिस्ट वर्षा गोरे यांनी द इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना सविस्तर माहिती दिली. त्या सांगतात, हाडे आणि दात मजबूत ठेवण्यासाठी कॅल्शियम खूप महत्त्वाची भूमिका बजावते. डॉ. गोरे सांगतात, साधारणपणे १००० ते १३००० मिलिग्रॅमपर्यंत तुम्ही नियमितपणे कॅल्शियमचे सेवन करायला पाहिजे. दूध हा कॅल्शियमचा सर्वोत्तम स्रोत आहे. एक कप दुधामध्ये ३०० मिलिग्रॅम कॅल्शियम असते. त्या पुढे सांगतात, शरीराची दुधातून कॅल्शियम शोषून घेण्याची क्षमता ही जास्त आहे. कारण- दुधात लॅक्टोज आणि इतर पोषक घटक जास्त असतात. त्याशिवाय दुधामध्ये जीवनसत्त्व ड असते; जे कॅल्शियम शोषून घेण्याचे प्रमाण वाढवते.मधुमेहाचा तुमच्या किडनीवर परिणाम होत आहे की नाही, हे कसं ओळखाल? कोणते पदार्थ खाणे टाळावेत? डॉक्टर सांगतात नियमित दूध प्यायल्याने स्त्रियांना होणारा ऑस्टिओपोरोसिसचा त्रास टाळता येतो. ऑस्टिओपोरोसिस म्हणजे हाडे कमकुवत होणे. स्त्रियांमध्ये हा त्रास जास्त जाणवतो. दुधातील कॅल्शियमच्या सेवनामुळे हाडांना प्रोत्साहन मिळते. शरीर निरोगी आणि संतुलित राहते.काही लोक दुधाचे सेवन करीत नाही, त्यांच्यासाठी कॅल्शियमचे अन्य पर्याय जाणून घेऊ.१. दूध किंवा दुग्धजन्य पदार्थांचे सेवन न करणे म्हणजे कॅल्शियमशी तडजोड करणे, असे नाही. दूध न पिता, तुम्ही कॅल्शियमच्या गरजा पूर्ण करू शकता. बदाम, सोया किंवा तांदळाचे दूध तुम्ही पिऊ शकता. या दुधामध्ये गाईच्या दुधाएवढी कॅल्शियमची मात्रा असते.२. हिरव्या पालेभाज्या, चांगल्या दर्जाचा संत्र्याचा रस, ॲप्रिकोट, सोयाबीनच्या दुधाचे पनीर हे कॅल्शियमचे उत्कृष्ट स्रोत आहेत.३. काही प्रकारचे मासे; जसे शेलफिशमध्येसुद्धा कॅल्शियमची मात्रा अधिक असते.वरील पर्याय कॅल्शियमची गरजा पूर्ण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. पण, त्याचबरोबर संतुलित आहार घेणे गरजेचे आहे. या पर्यायांसह इतर पौष्टिक घटक हाडे निरोगी ठेवण्यास मदत करतात आणि जे लोक दूध पीत नाहीत, त्यांच्या शरीराला कॅल्शियम पुरवतात.




## ज्ञान हे वापरल्याने वृध्दींगत होते : प्रा.डॉ. अनिल भिकाने

नागपूर दि. १ फ़ेब्रू (प्रतिनिधि : प्रवीण बागड़े) प्रशिक्षणामुळे माणसाच्या अंगी असलेल्या कलागुणांना वाव मिळतो, आत्मविश्वास निर्माण होतो. ग्राम परिवर्तन हे स्मार्ट प्रकल्पाचा हेतू आहे आणि प्रशिक्षणाच्या माध्यमातून पशुसखींचे सबलीकरण करण्यासाठी माफसु कटिबद्ध आहे. प्रशिक्षण फक्त ज्ञान देण्यासाठी नाही तर कौशल्य विकसित करून सर्वांगीण विकास साधने साठी असल्याचे प्रतिपादन प्रा.डॉ. अनिल भिकाने, संचालक, विस्तार शिक्षण महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांनी केले. ते जागतिक बँक अर्थसहाय्यित मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (स्मार्ट), पशुसंवर्धन विभाग व महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने शेळी व कुक्कुटपालन सुधारण्यासाठी पशुसखींचे कौशल्य वृद्धी प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत 'शेळी व परसातील कुक्कुटपालन' या विषयावर पशुसखींचे दि. १६ ते ३० जानेवारी दरम्यान आयोजित पंधरादिवसीय निवासी प्रशिक्षणाच्या सांगता कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. पशुसखींचे परिवर्तन करून सबलीकरण करण्याची जबाबदारी नागपूर पशुवैद्यक महाविद्यालय हे पार पाडत आहे आणि पुढेही महाविद्यालय अश्या प्रकाराचे प्रशिक्षण पशुसखींसाठी आयोजन करून पशुसखींना प्रशिक्षित करेल असे आश्वासन कार्यक्रमाचे अध्यक्ष सहयोगी अधिष्ठाता डॉ. सोमकुंवर यांनी केले. पशुसखी ही शासन आणि पशुपालक यांना जोडणारा दुवा आहे व त्या येणाऱ्या काळात पशुपालकांना नवसंजीवनी देतील असे मत स्मार्ट प्रकल्पाचे नोडल अधिकारी डॉ. कल्पना करगावकर यांनी मांडले. कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते प्रशिक्षण पुस्तिकेचे विमोचन तसेच प्रशिक्षणार्थ्यांना प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले. या प्रशिक्षणाच्या सांगता कार्यक्रमात पशुसखींनी पारंपारिक नृत्य आणि गीत सादर करून आयोजकांचे आभार व्यक्त केले. सदर कार्यक्रमात गोंदिया आणि भंडारा या जिल्ह्यातील




एकूण २५ पशुसखींनी प्रशिक्षण पूर्ण केले. प्रशिक्षण अतिशय उत्कृष्ट झाले बद्दलचा अभिप्राय श्रीमती लक्ष्मी मदमकर यानी दिला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहयोगी अधिष्ठाता डॉ आरजू सोमकुवर होते. या प्रसंगी व्यासपीठावर प्रकल्प समन्वयक डॉ सारीपुत लांडगे तर दृकश्राव्य माध्यमातून डॉ. राजू कोलते, सहाय्यक आयुक्त, पशुसंवर्धन विभाग तसेच स्मार्ट प्रकल्प चे नोडल अधिकारी डॉ. कल्पना करगावकर, डॉ. निलेश खलाटे, तांत्रिक अधिकारी, (पशुसंवर्धन अमलबजावणी कक्ष), पुणे व श्री अमृत इंगळे, उपव्यवस्थापक, माविम, मुंबई उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि प्रास्ताविक प्रकल्प सह समन्वयक तथा प्रशिक्षण समन्वयक डॉ. वैशाली बांठीया यांनी केले. तर प्रशिक्षण सहसन्वयक डॉ. दर्शना भैसारे यांनी आभार व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रशिक्षण सह समन्वयक डॉ. किशोर राठोड, डॉ. शाईनी जॉय, डॉ. अतुल ढोक, डॉ. सुरेश जाधव, डॉ. शिल्पश्री शिंदे, डॉ. प्रतिभा जुमडे, डॉ. गीतांजली धुमे, श्री. प्रवीण बागड़े, श्री. तुषार मेश्राम, श्री. एम. यु. गौतम व श्री. जुवार यांनी अथक परिश्रम घेतले.

## महात्मा बसवेश्वरचे गणेश शिंदे आणि कैवल्य पांचाळ यांची पंजाब येथील अखिल भारतीय राष्ट्रीय युवक महोत्सवाकरिता निवड

लातूर दि. ०१ महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील गणेश शिंदे आणि कैवल्य पांचाळ यांची स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या संघात लोकसंगीत या कला प्रकारातून अखिल भारतीय राष्ट्रीय युवक महोत्सवाकरिता नुकतीच निवड झाली. त्यांच्या या उज्ज्वल आणि नेत्रदीपक यशाबद्दल श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिवशंकर अप्पा बिडवे यांच्या शुभ हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे, उपप्राचार्य प्रा. संजय पवार, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, कार्यालयीन प्रमुख नामदेव बेंदरगे, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. रत्नाकर बेडगे, संगीत विभाग प्रमुख प्रा. विजयकुमार धायगुडे, प्रा. विश्वनाथ स्वामी, डॉ. यशवंत वळवी, डॉ. दिनेश मौने, डॉ. जितेंद्र देशमुख, प्रा. गोविंद पवार, प्रा. रवींद्र सोनोने, डॉ. टी. घनश्याम, प्रा. व्यंकट दुडिले आणि प्रा. किसनाथ कुडके आदीची उपस्थिती होती. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूरच्यावतीने आयोजित शतस्पंदन पश्चिम विभागीय आंतरराज्यस्तरीय युवक महोत्सव नुकतेच संपन्न झाले. या युवक महोत्सवात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या लोकसंगीत या कला प्रकारात महाविद्यालयाचे गणेश शिंदे आणि कैवल्य पांचाळ हे दोन विद्यार्थी सहभागी झाले होते. अखिल भारतीय राष्ट्रीय युवक महोत्सव करिता या संघाची निवड झाली. अखिल भारतीय युवक महोत्सव फेब्रुवारी महिन्याच्या अंतिम सप्ताहात पंजाब येथे संपन्न होणार आहे. त्यांच्या या निवडीबद्दल श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव मन्मथ अप्पा लोखंडे यांच्यासह सर्व सन्माननीय पदाधिकारी, प्राचार्य, उपप्राचार्य, पर्यवेक्षक, सांस्कृतिक विभागातील सदस्य, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी विद्यार्थिनींनी त्यांचे हार्दिक अभिनंदन कडून पुढील यशस्वी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



# किनवट पंचायत समिती कार्यालय बनले भ्रष्टाचाराचे कुरण; गटविकास अधिकारी यांची संमती असल्याची शंका?

किनवट / ता.प्रतिनिधी.शेख शौकत : – पंचायत समितीहा जिल्हा परिषद व ग्रामपंचायत यांच्या मधील दुवा असून शासनाच्या विविध योजना या कार्यालयामार्फत राबविल्या जातात. शेतकरी व सामान्य नागरिक यांचा या कार्यालयाशी नेहमीच प्रत्यक्ष संबंध येत असतो. पण ग्रामीण भागातील शेतकरी व नागरीक यांच्या अज्ञानाचा फायदा घेउन या कार्यालयातील भ्रष्ट अधिकारी व कर्मचारी सुलभ सोपे असलेल्या योजना क्लिष्ट करून त्या योजना मिळण्यास किती अवघड आहे असे दाखवून लाभार्थ्याकडून पैसे उकळण्याचा प्रकार सर्रास चालू आहे. या कार्यालयात अनेक वर्षापासून असलेले कर्मचारी येणाऱ्या प्रत्येक गटविकास अधिकारी यास मिसगाईड करून बाटलीत उतरवून आपल्या मर्जीप्रमाणे काम करून घेत असल्याचे अनेक उदाहरणे आहेत. लाभार्थ्यांना ग्राम पंचायत मार्फत अर्ज येऊन लाभ मिळणे अपेक्षित असताना परस्पर पंचायत समिती मधून आर्थिक देवाण घेवाणीतून लाभार्थी निवड केल्याचे अनेक उदाहरणे सांगता येतील.




किनवट पंचायत समिती कार्यालय सध्या या सर्व कारणामुळे अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी पैसे खाण्याचे कुरण बनले आहे असे म्हणल्यास वावगे ठरणार नाही. त्यामुळे किनवट पंचायत समिती कार्यालय भ्रष्टाचाराच्या विळख्यात सापडले असे सर्वसामान्यांमध्ये चर्चांना उधाण आले आहे.

शासन सर्वसामान्य मजूरदार शेतकरी यांचे हित डोळ्यासमोर ठेवून वैयक्तिक लाभाच्या व सामूहिक लाभाच्या योजना तयार करून या कार्यालयामार्फत राबवते. शेतकरी व सर्वसामान्य नागरिक यांचे कल्याण साधण्यासाठी विविध योजना राबवित आहे. त्या योजना अमलात आणण्याचे काम पंचायत समितीचे आहे. ग्रामीण भागातील शेतकरी व नागरिकांचा थेट संबंध या कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांशी येत असतो. पण हेच कर्मचारी अधिकारी शेतकरी व शेतमजूर वर्गाचे कुठलीही फाईल चिरीमिरी घेतल्याशिवाय मंजूर करत नाहीत. प्रत्येक कामाचे पैसे अधिकाऱ्यातून ठरवलेले आहेत. सदर फाईल पुढे सरकण्यासाठी ठराविक रक्कम न दिल्यास त्या फाईल कडे ढुंकूनही बघितल्या जात नाही. पण त्याच फाईलला ठराविक रक्कम दिल्यास ती फाईल लगेच मंजूर होते असे अनेक उदाहरणे बघावयास मिळतील. किनवट पंचायत समिती कार्यालयात काही कंत्राटी कर्मचारी व अधिकारी इतके निर्ढावलेले आहेत की ते उघड उघड सुद्धा पैसे घ्यायला घाबरत नाहीत यामुळे यामध्ये गटविकास अधिकारी सुद्धा सामील असल्याची शंका येते. लाभार्थी सुद्धा आपल्याला लाभ भेटणार नाही किरकिर नको म्हणून पैसे देऊन टाकतात. असे या कार्यालयाच्या भ्रष्ट कारभारामुळे लक्षित ज्यांना लाभ भेटायला पाहिजे असे लाभार्थी दूर राहून बोगस लाभार्थी चिरीमिरी देऊन लाभ घेतल्याचे दिसून येते. या अशा अनुचित प्रकारामुळे अनेक शेतकरी योजना च्या लाभापासून वंचित असल्याचे बघायला मिळतील. आधीच शेतकरी महागाई व निसर्गाची अवकृपा यामुळे नापिकिने त्रस्त झाला असून त्यात एखाद्या शासकीय योजनेचा लाभ घ्यायचा झाल्यास भ्रष्ट आधिकाऱ्यापासून सुटका नाही असे चित्र आहे. हा सर्व प्रकार इतका सराईतपणे चालतो की कर्तव्यदक्ष जिल्हा परिषदेच्या मुख्याधिकारी यांच्यापर्यंत जाईल व शेतकऱ्यांना न्याय मिळेल यात शंकाच आहे. यावर सी.ओ. म्याडम काय निर्णय घेणार याकडे शेतकरी व सर्वसामान्य नागरिक लक्ष लागले आहे.

## अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांनी ठिबक आणि तुषार सिंचन योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन

लातूर, दि. २ (जिमाका): अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांचा विकास व्हावा, यासाठी राष्ट्रीय कृषि विकास योजना प्रति थेंब अधिक पिक योजना सन २०२३-२४ अंतर्गत महाडीबीटी पोर्टलवर ठिबक व तुषार सिंचन योजनेचा लाभ देण्यात येत आहे. यासाठी जिल्ह्यातील अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतकरी बांधवांनी महाडीबीटी पोर्टलवर जास्तीत जास्त अर्ज करुन लाभ घेण्याचे आवाहन लातूर जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी एस. व्ही. लाडके यांनी केले आहे. अल्प व अत्यल्प भूधारक तसेच बहुभूधारक क्षेत्रातील अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतकरी बांधवासाठी राष्ट्रीय कृषि विकास योजना प्रति थेंब अधिक पिक योजना सन २०२३-२४ अंतर्गत अल्प व अत्यल्प भूधारक (२ हेक्टरपर्यंत क्षेत्र) शेतकऱ्यांना ५५ टक्के तर बिरसा मुंडा कृषि क्रांती स्वावलंबी योजना तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वालंबन योजनेंतर्गत ३५ टक्के असे एकूण ९० टक्के तर बहूभूधारक (२ हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्र) शेतकऱ्यांना राष्ट्रीय कृषी विकास योजनेतून ४५ टक्के असे एकूण ९० टक्के अनुदान असणारी लाभदायी योजना आहे. ठिबक व तुषार घटकामुळे उत्पादनात व उत्पादकतेत मोठ्या प्रमाणात वाढ होऊन आर्थिकस्तर उंचावण्यात मदत होईल. तसेच पाण्याचा काटेकोर वापर झाल्याने तणांची वाढ रोखण्यास मदत होते आणि सिंचन क्षेत्रात वाढ होईल. त्यामुळे जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन लातूर जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी श्री. लाडके यांनी केले आहे.

# उल्हासनगर महापालिके समोर लढा कामगार संघटनेचे आमरण उपोषण

उल्हासनगर/ प्रतिनिधी : उल्हासनगर शहरातील कचरा उचलणाऱ्या कोणार्क ग्रीन इनवायरो ही कंपनी कर्मचाऱ्या विरुध्द मनमानी पणे वागत असुन या कर्मचाऱ्याना नियमा प्रमाणे जे देय लागते ते देत नसुन मागील वर्षभरातील फरकाची रक्कम अद्याप दिली नाही. तर वेतन स्लिप न देता कर्मचाऱ्याना विना नोटीस कामावरुन कमी करण्यात येते, या अशा विविध मांगण्या साठी लढा कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संदीप गायकवाड हे आज पासुन उल्हासनगर महापालिकेसमोर आमरण उपोषणाला बसले आहेत. उल्हासनगर महापालिकेने शहरातील कचरा उचलन्याचा ठेका कोणार्क इनवायरो या कंपनीला प्रतिदिन ८ लाख रुपये या प्रमाणे दिला आहे. या कंपनीत जवळ पास २७० कर्मचारी काम करत आहेत. मात्र या कर्मचाऱ्याना कोणत्या ही सुविधा कंपनी देत नाही. अनेक वेळा सदर कंपनीला निवेदन देवुन मागणी केली आहे. परंतु कंपनी काही ऐकत नसल्याची प्रतिक्रिया लढा कामगार संघटनेचे अध्यक्ष संदीप गायकवाड यांनी दिली असुन ते आज पासुन कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्या घेवुन महापालिके समोर आमरण उपोषणाला बसले आहेत. त्यांनी दिलेल्या निवेदनात बारा मागण्या नमुद केल्या आहेत. त्या मध्ये कामगार कायद्या प्रमाणे किमान वेतन , दिलेल्या वेतनाची व किमान वेतन यातील फरकाची रक्कम खात्यावर जमा करा , सर्व कर्मचाऱ्याना कंपनीचे ऑन ड्युटी यु एम सी असे ओळखपत्र द्या. वेळेवर वेतन अदा करा , वेतन स्लिप द्या , ई एस आय सी वैद्यकीय सुविधा उपलब्ध करुन द्या , कंपनी मार्फत मोबाईल रिचार्ज व डेटा देण्यात यावा , किमान आठ तास ड्युटी देण्यात यावी , ओव्हर टाईम चे पैसे द्या, कर्मचाऱ्याना सन्मानाने वागणुक द्या , कोणत्या ही कर्मचाऱ्याला विना नोटीस कामावरुन कमी करु नये , कर्मचाऱ्याना पी एफ व वैद्यकिय सुविधाची माहीती द्या , वाहनचालक ऑन ड्युडी असताना अपघात झाल्यास व वाहन चालकाची चुकी नसताना त्याच्यावर दंडात्मक कारवाई करु नये या अशा विविध मागण्या निवेदनात नमुद केल्या असुन या मागण्या ताबडतोब मंजुर करण्यात याव्यात म्हणुन लढा कामगार संघटनेने आज पासुन महापालिके समोर आमरण उपोषण सुरु केले आहे. शहरात कोणार्क कंपनी ही कर्मचाऱ्यांचा छळ करत असल्याचा आरोप संदीप गायकवाड यांनी केला आहे. या बाबत कंपनी व्यवस्थापक यांच्या शी संपर्क साधन्याचा प्रयत्न केला असता संपर्क होवु शकला नाही.

# सुराज्य निर्माण सेना पक्षाच्या जिल्हाध्यक्षपदी भागवत भुजबळ यांची नियुक्ती

लातूर – दि. सुराज्य निर्माण सेना पक्षाच्या जिल्हाध्यक्षपदी भागवत भुजबळ यांची नियुक्ती करण्यात आली.बार्शी रोड येतील गणेश कॉम्प्लेक्स येथे बैठक संपन्न झाली.यावेळी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शिवानंद मठपती हे अध्यक्षस्थानी तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी सहशिक्षक वीरभद्र मठपती होते. यावेळी जिल्हाध्यक्ष म्हणून भागवत भुजबळ, उपाध्यक्ष बालाजी नागीने, शहराध्यक्ष बालाजी गिरी यांची नियुक्ती करून नियुक्तीपत्र देण्यात आले.




मार्गदर्शन पर बोलताना प्रदेशाध्यक्ष शिवानंद मठपती म्हणाले सध्याच्या प्रस्थापित पक्षाला जनतेचे काहीच देणे घेणे नाही, खुर्चीसाठीच प्रयत्न अहोरात्र अशी अवस्था झाली आहे. बोलताना ते पुढे म्हणाले महागाईने कळस गाटला आहे, बेरोजगारीने उच्चांक गाटला आहे अशा परिस्थितीत जनसामान्याचे व तळागाळातील सामान्य जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी सुराज्य निर्माण सेना कटिबद्ध आहे. वीरभद्र मठपती म्हणाले सामान्य जनतेला एक पर्याय हवा आहे आणि तो पर्याय सुराज्य निर्माण सेना पक्ष आहे. जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबद्दल भागवत भुजबळ म्हणाले सुराज्य निर्माण सेना या पक्षात मी प्रवेश केला आहे आणि या पक्षाचे कार्य तन मन आणि धन लावून सामान्य जनतेला न्याय देण्यासाठी सज्ज आहे. यावेळी बिराजदार लक्ष्मण, दगडू अंडरगुळे, सिद्धेश्वर बिराजदार, संजय भुजबळ, गजानन लखादिवे, स्वप्निल हंडरगुळे, वामनराव ईनकर यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक पत्रकार लहू शिंदे यांनी केले तर शेवटी आभार संजय भुजबळ यांनी मानले यावेळी अनेक कार्यकर्ते व नागरिक उपस्थितीत होते.

# उल्हासनगर येथे १२ फेब्रुवारी ला राष्ट्रवादी कॉँग्रेस अध्यक्ष शरद पवार येणार

उल्हासनगर / प्रतिनिधी : राज्यातील ६२ हजार शासकीय शाळानां शिंदे सरकारने खासगी कंपन्यानां देण्याचा घाट घातला असून सरकार च्या या धोरणा विरोधात संविधान हक्क परिषद च्या वतीने उल्हासनगरात भव्य मेळाव्या चे आयोजन करण्यात आले आहे . या मेळाव्याला मार्गदर्शन करण्या साठी राष्ट्रवादी कॉँग्रेस चे नेते शरद पवार उपस्थित राहाणार असल्याची माहिती परिषद चे सचिव अनिल अहिरे यांनी दिली आहे. महाराष्ट्र शासना ने मागच्या काही महिन्या पूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत राज्यातील ६२ हजार शाळा खासगी कंपन्याना देण्याचा प्रस्ताव मंजुर केल्याने राज्यात एकच खळबळ उडाली होती. शासनाच्या या धोरणा बद्दल संविधान हक्क परिषद ने तीव्र विरोध केला, असून हा प्रस्ताव तातडी ने रद्द करावा या साठी परिषदे च्या वतीने जन जागृती मोहिम सुरु केली आहे. दरम्यान १२ फेब्रुवारी रोजी उल्हासनगर च्या कॅम्प नंबर पाच येथील दसरा मैदानात संविधान हक्क परिषदे च्या वतीने शाळा बचाव मोहिमेंतर्गत भव्य मेळाव्या चे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्याचे उद्घाटन राष्ट्रवादी कॉँग्रेस चे ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमात संविधान हक्क परिषद चे अध्यक्ष रामचंद्र जाधव, अण्णा रोकडे, प्रसिध्द गायिका निशा भगत, डॉ जानू मानकर, किरण सोनवणे, बेळमकर, प्रकाश जाधव आदि उपस्थित राहणार असल्याची माहिती श्री अहिरे यांनी दिली आहे.

## मागच्या घोषणाचा विसर अन् नव्या योजनांचा पाऊस – खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर

अर्थसंकल्पात वाढलेल्या महागाईबाबत ब्र शब्द काढलेला नाही. शेतीसंदर्भात दरवर्षी किमान आकडेवारी देऊन धुळफेक केली जात होती यंदातर तेही केल्याच दिसत नाही. सरकारच धोरण शेतकरीविरोधी आहे हे पुन्हा एकदा सिध्द झालं आहे. हा हंगामी अर्थसंकल्प असल्याने गेल्यावर्षी केलेल्या घोषणा पुर्ती झाली का सांगणे आवश्यक होते. त्याकड अर्थमंत्री यानी पुर्ण दुर्लक्ष केल आहे.



गेल्यावर्षी शेतकरी कल्याण मंत्रालयाला सव्वा लाख कोटी रुपये दिले होते. पण उदिष्टपुर्ती बाबत मौन बाळगल्याने फक्त घोषणा करणारं सरकार अशी प्रतिमा निर्माण झाली आहे.मागच्या घोषणांचा विसर तर पुढच्या घोषणाचा पाऊस अशी निराशाजनक अवस्था अर्थसंकल्पात दिसत आहे. निवडणुका डोळ्यासमोर ठेऊन देशातील जनतेला आकर्षित करण्याचा केविलवाणा प्रयत्न केलाय एवढच दिसत आहे. सर्वच घटकांचा भ्रमनिरास केला असुन विशेषकरून महाराष्ट्राची घोर निराशा या अर्थसंकल्पाने केली आहे.

## पी. डी. कारखानीस महाविद्यालयामध्ये पोवाडा सादरीकरणात मुंबई विद्यापीठाचे द्वितीय पारितोषिक प्रदान

उल्हासनगर / प्रतिनिधी : शैक्षणिक वर्ष २०२३-२४ या वर्षातील मुंबई विद्यापीठाच्या डी एल एल ई या विभागातर्फे उडान द फ्लाइट ऑफ एक्स्टेंशन- २०२४ या वार्षिक महोत्सवात झोन पातळीवरील ललित कलांच्या सादरीकरणाची अंतिम फेरी एस एस टी महाविद्यालयात घेण्यात असुन त्यामध्ये पी. डी. कारखानीस कॉलेजला द्वितीय क्रमांकाचा मान मिळाला आहे . आत्मनिर्भर भारत ही मध्यवर्ती थीम घेवून पोवाडा सादर केला. कल्याण परिसरातील एकूण वीस महाविद्यालयांनी स्पर्धेत सहभाग घेतला होता . डी एल एल ई चे प्रमुख प्रा. अनिल बोराडे, कला दिग्दर्शक श्री. भास्कर थोरात, टीम मॅनेजर रोहित निकुंभ, पूर्वा गायकवाड तसेच पोवाडा गायन स्पर्धेतील सहभागी विद्यार्थी रितेश भीमा लाडके, श्रेयस अजित सिंगासने, मंदा शिवाजी धनावडे, सानिका सुभाष गोरेगांवकर, भूमिका राजेश अभंगे, ज्ञानेश्वर संजय शिंदे, प्रेरणा गजानन जालिंदर, मानसी बाळासाहेब गायकवाड, निखिल दादु वाघ, गौरव भोईर, प्रियांका माने यांनी प्रचंड मेहनत घेतली.सदर मिळालेल्या पारितोषिकाच्या या घटनेने महाविद्यालयात आनंदाचे वातावरण तयार झाले आहे. त्याचाच एक भाग म्हणून सहभागी विद्यार्थ्यांचा गुणकौतुक सोहळा प्राचार्यांच्या दालनात आजोजित केला होता. त्यावेळी बऱ्याच विद्यार्थांनी 'आम्हांला बरेच काहीं शिकायला मिळाल्या'ची मनोगतं व्यक्त केले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संदीपान नवगिरे , प्रा. डॉ.आनंद दांडगे , प्रा. संजय निचिते ,डॉ. शुभांगी केदारे ,प्रा. गौतम जावळे , प्रा. इब्राहीम तडवी व शिक्षकेतर वर्गामध्ये श्री. पद्मनाभ जोशी , श्री. योगेश वीरणक, सौ. रेखा वाघ, श्री. विनोद भोसले या वेळी उपस्थित होते.तर सगळ्यांनी शुभेच्छांपर भाषणातून सहभागी विद्यार्थ्याचे मोठे कौतुक केले.

# पत्रकारावर प्राणघातक हल्ला.गुन्हा नोंद करण्यासाठी प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघाचे जिल्हाधिकारी यांना निवेदन

लातूर :- पत्रकारावर प्राण घातक हल्ला करणाऱ्यावर पत्रकार संरक्षण कायदा अंतर्गत तात्काळ गुन्हा नोंद करावा यासाठी प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघ जिल्हा शाखा लातूरच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

काटगाव तालुका लातूर येथील जिल्हा परिषद शाळेतील काही विद्यार्थ्यांना इन्स्पेक्शनच्या नावाखाली अनेक वेळा संडास बाथरूम साफ करून घेतले. सदर प्रकरण विद्यार्थ्यांच्या पालकावर दबाव आणून मिटवण्याचा प्रयत्न केला. या घटनेचा जाब विचारण्यासाठी विद्यार्थ्यांचे पालक व क्राईम रिपोर्टर चे संपादक धनराज वाघमारे गेले असता मुख्याध्यापक यांनी अरेरावीची भाषा करून गावची इज्जत बाहेर काढतोस का म्हणून मुख्याध्यापक व गावातील गावगुंडांनी पत्रकारावर प्राण घातक हल्ला केला. पत्रकार धनराज वाघमारे हे सिव्हील हॉस्पिटल लातूर येथे ऍडमिट आहेत.



*सदर घटनेची तात्काळ चौकशी करून पत्रकार धनराज वाघमारे व कॅमेरामन यांच्यावर प्राण घातक हल्ला करणाऱ्या गावगुंडावर तात्काळ पत्रकार संरक्षण कायदयाअंतर्गत गुन्हा नोंद करावा.

*पीडित मुलींना वारंवार संडास बाथरूम साफ करण्यास भाग पाडून शिक्षण विभागास काळे फासणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांना तात्काळ सेवेतून निलंबित करून फौजदारी कारवाई करावी.

*पीडित मुलीच्या पालकास दडपशाही करत जबरदस्तीने आमची तक्रार नाही असा जाब नोंदवून घेणाऱ्या वरिष्ठ अधिकारी (बी ओ) यांना सेवेतून तात्काळ निलंबित करावे.

*मुलीच्या पालकांची तक्रार नोंदवून घेणाऱ्या लाचखोर सहाय्यक पोलीस निरीक्षक व भाग जमादार यांची तात्काळ बदली करावी.

*दहशत माजवणाऱ्या गावगुंडावर काय एम पी डी ए अंतर्गत कारवाई करावी.

*गावगुंडांनी दडपशाही खाली ठेवलेल्या पालक व मुलींचे पुनर्वसन करावे.

सदर मागण्याचे निवेदन जिल्हाधिकारी लातूर, पोलीस अधीक्षक लातूर, व सीईओ यांना प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघ जिल्हा शाखा लातूर च्या वतीने देण्यात आले.

या निवेदनावर जिल्हाध्यक्ष लहूकुमार शिंदे, उपाध्यक्ष महादेव पोलदासे, प्रसिद्धीप्रमुख संतोष सोनवणे, ज्येष्ठ पत्रकार शिरीषकुमार शेरखाने, कार्याध्यक्ष रियज शेख, ड. राजकुमार दाभाडे, संपादक दिनेश गिरी, आनंद दनके, लिंबराज पन्हाळकर, अमोल इंगळे, साईनाथ घोणे, अमोल घायाळ, नेताजी जाधव, कृष्णा कोल्हापुरे, नरसिंगे व्यंकटेश, अहिल्या कस्पटे, विजय गायकवाड आदींच्या सह्या आहेत.

## वाढत्या महागाईचा सरकारला विसर

आगामी लोकसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून गरीबी हटवू, ३०० युनिट मोफत वीज देऊ, २ कोटी घरे बांधू... अशा लोकप्रिय घोषणा केंद्र सरकारने या अर्थसंकल्पात केल्या. पण, महागाई कमी करू, असे कुठेही म्हंटले नाही. घरगुती गॅस असेल किंवा पेट्रोल - डिझेलचे दर गगनाला भिडले आहेत. सर्वसामान्यांचे जगणे मुश्कील झाले आहे. तरुणांना नोकऱ्या नाहीत. शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव नाही. पण, याकडे केंद्र सरकारचे साफ दुर्लक्ष झाले आहे. महागाईला आळा घालण्यासाठी त्यांनी कुठलीही तरतूद केली नाही. त्यामुळे सर्वसामान्यांसाठी हा अर्थसंकल्प निराशादायक आणि तितकाच अपेक्षाभंग करणारा आहे.



– धिरज विलासराव देशमुख
आमदार, लातूर ग्रामीण

# क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांचा दौरा

लातूर, दि. २ (जिमाका): राज्याच्या क्रीडा व युवक कल्याण, बंदरे विभागाचे मंत्री संजय बनसोडे हे शुक्रवार, २ फेब्रुवारी २०२४ रोजी लातूर जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. ना. बनसोडे यांचे २ फेब्रुवारी रोजी सकाळी ६.३० वाजता लातूर येथे आगमन होईल व शकुंतला निवासस्थान येथे राखीव. सकाळी ९.३० वाजता ते मोटारीने पळसप (ता.जि. धाराशिव)कडे प्रयाण करतील. दुपारी १.३० वाजता त्यांचे लातूर येथे आगमन होईल व कातपूर रोडवरील पार्वती मंगल कार्यालयात कै. लालासाहेब मुकुंदराव देशमुख यांच्या मुलीच्या विवाह सोहळ्यास ते भेट देतील.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE